सुविचार
सभी परिस्थितियों में सन्तुलन बनाये रखना प्रसन्न की चाबी है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेव वृत्तपत्र

दैनिक
यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४✦वर्ष ५३ वे✦अंक- ३१ ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

भाजपमध्ये पक्षांतर्गत 'सर्जिकल स्ट्राईक'चे संकेत

नागपूर : विशेष प्रतिनिधी- भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या एका वक्तव्याने मोठी खळबळ उडाली आहे. सध्या भाजपचे पीक जोमात आले आहे, हे त्यांनी ठासून सांगितले तर या विधानसभा निवडणुकीत भाजपासह महायुती जोरदार कामगिरी बजावणार असल्याचा दावा केला. त्याचवेळी त्यांनी पक्षातंर्गत सर्जिकल स्ट्राईकचा बॉम्ब टाकला. गडकरी हे स्पष्ट वक्ते म्हणून ओळखले जातात. बेधडक वक्तव्यामुळे जनता त्यांच्यावर प्रेम करते. भाजपामध्ये अनेकजण येत आहेत. पक्षात गोतावळा वाढत आहे, असे सांगत त्याचवेळी त्यांनी पक्षांतर्गत सर्जिकल स्ट्राईक होणार असल्याचा बॉम्ब टाकला आहे. त्यांच्या वक्तव्याने आयाराम-गयाराम नेत्यांचे धाबे दणाणले आहे.



आपल्या देशात मतभेद ही काही समस्या नाही. पण विचारांचा, धोरणांचा अभाव ही मोठी समस्या आहे. सोयीच्या राजकारणाचे धोरण महत्त्वपूर्ण नाही, तर विचारधारेशी सुसंगत राजनीती महत्त्वाची असल्याचे गडकरी म्हणाले. यावेळी त्यांनी नव्याने दाखल होत असलेल्या विविध विचारधारेतील कार्यकर्ते, नेत्यांना या माध्यमातून गर्भित इशारा पण दिला. भाजपमध्ये इतर पक्षाचे नेते आणि कार्यकर्ते विविध कारणांमुळे दाखल होत आहेत. जस जसे पीक जोमात येते. तसे रोगाचा प्रादुर्भाव वाढतो. चांगल्या धान्याला कीड लागते. पीक वाचावं यासाठी मग रोगावर कीटकनाशक मारावे लागते, असा इशारा त्यांनी दिला.

मविआच्या जाहीरनाम्यात आश्वासनांची उधळण

मुंबई : प्रतिनिधी- राहुल गांधी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत झालेल्या जाहीरसभेत ५ मोठ्या घोषणा केल्यानंतर महाविकास आघाडीने आज आपला विस्तृत जाहीरनामा प्रसिद्ध केला. 'महाराष्ट्रनामा' नावाने प्रसिद्ध केलेल्या या जाहीरनाम्यात महिलांना वर्षाला ५०० रुपयांत ६ गॅस सिलेंडर, महिला अत्याचाराला आळा घालण्यासाठी शक्ती कायदा, १०० युनिटपर्यंत मोफत वीज, २.५ लाख सरकारी नोकर भरती आदी आश्वासन देण्यात आली आहेत.

महाराष्ट्राची निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे. भाजपा युतीचे खोके सरकार सत्तेतून खाली खेचून महाविकास आघाडीचे आणा, असे आवाहन काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी केले.

महाविकास आघाडीच्या ६ तारखेला झालेल्या जाहीरसभेत महिलांना दरमहा ३ हजार मानधन व मोफत बस प्रवास, बेरोजगारांना दरमहा ४ हजार, शेतक-यांची ३ लाखापर्यंतची कर्जमाफी, जातनिहाय जनगणना, मुलींप्रमाणे मुलांनाही मोफत शिक्षण, २५ लाखांचा आरोग्य विमा आदी घोषणा करण्यात आल्या होत्या.

(पान २ वर)

भाजपाचे संकल्पपत्र जाहीर

मुंबई : भारतीय जनता पार्टीचे संकल्पपत्र हे २०२९पर्यंत राज्य विकासाची व्यापक दृष्टी आणि त्या दिशेने वेगाने कृती करण्याची खात्री देणारे आहे. महायुती सरकार कोणत्याही भेदभावाशिवाय सर्वांच्या विकासासाठी कार्यरत आहे. राज्यातील जनतेचे जीवन उज्वल आणि सुकर व्हावे यासाठी महायुती सरकार काम करत आहे. विकसित महाराष्ट्रासाठी महाराष्ट्रात पुन्हा महायुती सरकारच हवे असे प्रतिपादन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत केले.

भाजपा मीडिया सेंटरमधील या पत्रकार परिषदेला राष्ट्रीय प्रवक्ते डॉ. सय्यद जफर इस्लाम, प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते ओमप्रकाश चौहान आदी उपस्थित होते. जनतेच्या मनात कायम भ्रम निर्माण करून आपले राजकीय हित साधण्याचा प्रयत्न करणाऱ्या महाविनाश आघाडीचा पराभव निश्चित असून विधानसभा निवडणुकीत जनता आघाडीला धडा शिकवेल आणि महायुतीचेच सरकार सत्तेवर आणेल, असा विश्वास ही त्यांनी व्यक्त केला.



गोयल म्हणाले की, केंद्रातील एनडीए सरकारच्या साथीने महायुती सरकार तिप्पट वेगाने प्रगती करून तिप्पट परिणाम साध्य करत आहे. जनता त्याचा अनुभव घेत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने देशाला नव्या उर्जे सोबत विकासाचे नवे पंखही दिले आहेत. समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत केंद्र आणि राज्यातील सरकारच्या जनकल्याणाच्या योजनांचे लाभ पोहोचवण्यासाठी आमचे सरकार तत्पर आहे. तर दिलेले कोणतेही आश्वासन न पाळणा-या महाविनाश आघाडीने दिलेल्या वचनांवर जनतेचा आता काडीमात्र ही विश्वास नाही. काँग्रेसने त्यांची सत्ता असलेल्या राज्यांमधील शेतकरी, युवावर्गाची दिशाभूल करून एकाही आश्वासनाची पूर्तता न करता (पान २ वर)

काँग्रेसचे १६ उमेदवार ६ वर्षांसाठी निलंबित

मुंबई : काँग्रेसने विधानसभा निवडणुकीत बंडखोरी करून निवडणूक लढवणा-या १६ उमेदवारांचे ६ वर्षांसाठी निलंबन केले आहे. काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या सूचनेनुसार त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. महाविकास आघाडीतील इतर मित्रपक्षांनी उमेदवार देऊनही काही इच्छुकांनी बंडखोरी करत उमेदवारी अर्ज दाखल केले, अशा बंडखोरांविरोधात ही कारवाई करण्यात आली आहे.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्निथला यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांविरोधात निवडणूक लढवणा-या काँग्रेसच्या १६ बंडखोर उमेदवारांवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतरही कारवाई करण्यात आली आहे. दरम्यान, भाजपमध्येहही ३७ विधानसभा मतदारसंघांतील ४० नेते आणि पदाधिका-यांची हकालपट्टी करण्यात आली आहे.

निलंबित करण्यात आलेले उमेदवार

भिवंडी - विलास पाटील आणि आसमा जव्वाद चिखलेकर, मीरा भाईंदर - हुंसकुमार पांडे, कसबा पेठ - कमल व्यवहारे,अहमदनगर शहर - मंगल विलास भुजबळ, कोपरी पाचपाखाडी - मनोज शिंदे आणि सुरेश पाटील खेडे, पलूस कडेगाव - मोहनराव दांडेकर, भंडारा - प्रेमसागर गणवीर, अर्जुनी मोरगाव - अजय लांजेवार, उमरखेड - विजय खडसे, यवतमाळ - शबीर खान, राजापूर - अविनाश लाड, कटोल - याज्ञवल्क्य जिचकार, रामटेक - राजेंद्र मुळक, आमरोली- आनंदराव गेडाम आणि शिलु चिमूरकर, गडचिरोली - सोनल कोवे आणि भरत येरमे, बल्लारपूर - अभिलाषा गावतुरे आणि राजू झोडे.

भविष्यातील लातुरसाठी एकमेकांच्या साथीने काम करू

लातूर/प्रतिनिधी:लातुरला शैक्षणिक हब,उद्योग नगरी तसेच स्वच्छ व सुंदर करण्यासाठी खूप काम करण्याची आवश्यकता आहे.आपली माझ्याकडून तशी अपेक्षाहि आहे. एकमेकांच्या साथीने आपण सर्वजण प्रयत्न करून भविष्यातील लातूर घडवू,असा विश्वास भाजपा महायुतीच्या लातूर मतदार संघातील उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी दिला.

शहरातील सीए,व्यापारी व बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने विष्णूजी की रसोई गार्डन येथे आयोजित संवादात डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर बोलत होत्या.यावेळी सुबोध बेळंबे,किरण मंत्री, ॲड. ऋषिका पाटील, राहुल धरणे, जगदीश कुलकर्णी, सीए आनंद बारपुते, सुशील बेळंबे,श्रीकांत बेळंबे यांच्यासह शैलेश गोजमगुंडे,संतोष हत्ते, कुशाग्रसिंह आदींची उपस्थिती होती. प्रारंभी सीए,व्यापारी व बांधकाम व्यावसायिक यांच्या वतीने मनोगत व्यक्त करताना एअर कनेक्तिव्हिटी असायला हवी. आयटी हब असल्यामुळे बेंगलोर आणि दिल्लीची कनेक्टिव्हिटी असावी.लातुरची आयटी हब म्हणून ओळख निर्माण व्हावी यासाठी प्रयत्न करण्याच्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.आतापर्यंत आम्ही जाहीरनामे पाहून मतदान केले.आता आपले काम पहायचे आहे,अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली होती. (पान ७ वर)



काँग्रेसच्या काळातच दलितांवर सर्वाधिक अत्याचार:रामदास आठवले

लातूर/प्रतिनिधी: काँग्रेसच्या काळातच दलितांवर सर्वाधिक अत्याचार झाले.त्यावर उपाययोजना केल्या नाहीत. सत्ता असताना काँग्रेसने काय दिवे लावले ? असा सवाल करत राहुल गांधी यांना संविधानाची माहिती नाही. केवळ सत्ता मिळविण्यासाठी संविधान बदलाचा भ्रम या पक्षाने पसरवला.या माध्यमातून जनतेची फसवणूक करणाऱ्यांना शिक्षा द्या,असे आवाहन केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ शहरातील शाहू चौक येथे आयोजित सभेत आठवले बोलत होते.या सभेस माजी खासदार अमर साबळे, डॉ. सुनिल गायकवाड,उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे,माजी अध्यक्ष शैलेश लाहोटी,राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते ॲड.व्यंकट बेद्रे, प्रशांत पाटील,शिवसेनेचे ॲड. बळवंत जाधव,जितेंद्र बनसोडे,मोहसीन शेख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.



उपस्थितांना मार्गदर्शन करताना रामदास आठवले म्हणाले की,काँग्रेसची राजवट भ्रष्टाचाराने बरबटलेली होती. त्याच काळात दलितांवरही अत्याचार घडत गेले.आता सत्ते बाहेर असताना काँग्रेस आरोप करत आहे.पण केंद्रात मोदींच्या नेतृत्वात राष्ट्रीय लोकशाही आघाडी व राज्यात महायुती सरकार आपल्या हितासाठी काम करत आहे.नरेंद्र मोदी हे क्टिव्ह पंतप्रधान आहेत.बौद्ध समाज आणि दलितांना न्याय देण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे.मागील ८ वर्षांपासून मी मंत्रिमंडळात आहे.मोदी यांनी संविधानाला नतमस्तक होत कारभार हाती (पान ७ वर)

महायुतीचे सरकार लबाड सरकार: आ.धिरज देशमुखांची घणाघाती टीका

लातूर (प्रतिनिधी) विधान निवडणुकीच्या तोंडावर लाडकी बहीण सारखी योजना आणून आम्ही जुगाड केले, असे महायुतीचे आमदार सांगत आहेत. योजना आणून जनतेवर दडपशाही करणे, भीती दाखवणे, कसलाही विचार नसलेले हे महायुतीचे सरकार म्हणजे एक लबाड सरकार आहे, अशी घणाघाती टीका आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली. ते लातूर तालुक्यातील गातेगाव, एकुर्गा, ढाकणी या गावांमध्ये संवाद बैठकीमध्ये बोलत होते. आम्ही शेतकऱ्याचे खिसे भरण्याचं काम करतो हे खिशाला कात्री लावण्याचं काम करतात, असे देखील देशमुख म्हणाले.

धिरज देशमुख बोलताना म्हणाले की, . जीएसटी आम्ही भरतो. कर्जमाफी मात्र उद्योगपतींना दिली जाते. महायुती सरकारने साडे बारा हजार कोटी रुपयांची उद्योगपतीं कर्ज माफ केले. दुसरीकडे शेतकरी हमीभाव मागतो, त्यांना हमी भाव मिळत नाही. महाराष्ट्रामध्ये अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. बेरोजगारी, महिला सुरक्षा, शेतीमालाला भाव पाहिजे असेल तर महाविकास आघाडी सरकार हाच जनतेसमोर समर्थ पर्याय आहे.



महायुतीकडे व्हिजन नाही देशमुख

निवडणुकीत एक व्हिजन असले पाहिजे. पण महायुतीकडे काही व्हिजन नाही. केंद्र सरकारने दोन कोटी रोजगार उपलब्ध करून देऊ असं सांगितलं. ते रोजगार का देऊ शकले नाहीत. आज जे उद्योग लातूरमध्ये आहेत. तेथे लातूरचीच मुले कामाला आहेत. आम्ही शेतकऱ्यांच्या मुलाला ऊस तोडणी यंत्र दिले. त्यांना उत्पन्न मिळवून दिले. साडेचारशे बेरोजगारना मांजरा परिवारांने रोजगार दिला, असल्याचे देखील आमदार देशमुख यांनी सांगितले. तुमचे खिसे भरले पाहिजेत त्याला कात्री नको. केंद्र व राज्य सरकार रोजगार का देऊ शकले नाहीत असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

एकीकडे शेतकऱ्यांना वीज मोफत म्हटली जाते आणि घरगुती विजेचे दर वाढवले आहेत. महाराष्ट्राची निवडणूक आहे. (पान ७ वर)

आता चुक केली तर तुम्हाला काळही माफ करनार नाही : बसवराज पाटील



औसा : चांगल्या कामाला चांगले म्हणायची दानत उजनी गावातील लोकांमध्ये असल्याने त्यांनी गेल्या पंधरा विस वर्षापासुन लोकप्रतिनिधींनी केलेल्या कामाचे मुल्यमापन करणे गरजेचे आहे. माझ्या कार्यकाळात सुरु केलेला विकास आमदार अभिमन्यू पवारांनी आणखीन नेटाने सुरु ठेवला असुन त्यांनी या भागाचा कायापालट करतांना बेरोजगारांना कामाच्या संधी उपलब्ध करुन देत बेलकुंड येथे आडीशे हेक्टरवर येनाऱ्या एमआयडीसीमुळे येथे मोठ मोठे उद्योग येनार आहेत. यामुळे रोजगाराला चालना मिळणार असुन कामाच्या माणसाला निवडण्यात जर तुम्ही चुक केली तर तुम्हाला काळही माफ करणार नसल्याचे माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर यांनी म्हटले आहे. रविवारी (दि.१०) रोजी आमदार अभिमन्यू पवार यांच्या प्रचारार्थ आयोजीत सभेत ते बोलत होते.

यावेळी व्यासपिठावर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख शिवाजी माने, कोळी महासंघाचे अध्यक्ष चैतन्य पाटील, शिवसेनेचे तालुका प्रमुख तानाजी सुरवसे, ॲड. श्रीकांत सुर्यवंशी, काकासाहेब मोरे, सेनेच्या महीला आघाडीच्या सहसंपर्कप्रमुख रंजना कुलकर्णी, अर्जना बिराजदार, प्रविण कोपरकर, हणमंत राचट्टे, संगमेश्वर ठेसे, बसवराज धाराशिवे, अरुण मुकडे, डॉ सुभाष ढवण, डॉ बाळासाहेब गंगणे, दिलीप कागे, मजहर पठाण, गिरीराज सोमाणी, काशीनाथ सगट, अण्णाराव सुर्यवंशी, बळीदादा वळके,अण्णाराव सगट आदी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना बसवराज पाटील म्हणाले की, आम्ही विचार आणि विकासाच्या मुद्यावर एकत्र आलो आहोत. औसा तालुका प्रचंड मागास होता. या तालुक्यात मी आमदार होण्याच्या आगोदर विकासाचा प्रचंड अनुशेष होता. रस्ते, सिंचन, पाणी यावर काम करणे गरजेचे असल्याने मी त्यावर भर दिला. मी केलेल्या विकास कामांना नेटाने आमदार अभिमन्यू पवार पुढे नेत आहेत. त्यांनी रस्ते, पाणी, सिंचन, शेती, उद्योग या बाबत भरीव कामे केली आहेत. माझा ड्रीम प्रोजेक्ट असलेला लातुर-गुलबर्गा रेल्वेमार्ग पवारांनीच दिल्लीत जाऊन मार्गी लावला. मी विरोधात असतांनाही औशाच्या विकासावर त्यांनी माझ्याशी वारंवार चर्चा केली. सल्ला घेतला. यावरुन त्यांच्यामध्ये लपलेल्या खऱ्या लोकप्रतिनीधीची छबी मला दिसली. गेल्या पाच वर्षात त्यांनी या मतदारसंघासाठी केलेली कामे पाहता त्यांना आणखीन संधी देणे गरजेचे आहे. पाहूणा शेजारी सोयरा हे न पाहता काम करनारा लोकप्रतिनिधी निवडला पाहीजे. विकासाच्या मुद्दयावर लोकांनी पुन्हा एकदा अभिमन्यू पवारांना प्रचंड मताधिक्याने विजयी केले पाहीजे असे अवाहन त्यांनी यावेळी (पान ७ वर)

आ. रमेशआप्पा कराड यांना धनगर समाज पाठिंबा

लातूर दि.१० - लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांना धनगर समाज संघर्ष समितीच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला असून समाजाच्या हितासाठी आणि उन्नतीसाठी महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून आप्पांच्या विजयात सिंहाचा वाटा उचलावा असे आवाहन पद्मश्री खा. डॉ. विकास महात्मे यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील धनगर समाजातील प्रमुख बांधवांची बैठक लातूर येथे रविवारी धनगर समाज संघर्ष समितीचे संस्थापक पद्मश्री खा. डॉ. विकास महात्मे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी माजी राज्यमंत्री रामराव वडकुते, महायुतीचे उमेदवार आ रमेशआप्पा कराड, संघर्ष समितीचे प्रदेशाध्यक्ष अनंत बनसोडे, भाजपाचे नेते राजेश कराड, धनगर समाज नेते अनिल गोयकर, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, उद्योग आघाडीचे रामलिंग मद्दे, संघर्ष समितीचे जिल्हाध्यक्ष अनिल पुजारी, भाजपाचे विजय काळे, दत्ता सरवदे, ओबीसी महिला आघाडीच्या हेमा येळे, सुमित्रा चिगुरे, अनिता कुसनुरे, लता घायाळ, हरीभाऊ काळे, अभिमन्यू माने, विष्णू पाटील, विठ्ठल कस्पटे, नानासाहेब कसपटे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी बोलताना खा. विकास महात्मे म्हणाले की, काँग्रेस आघाडीने धनगर समाज हितासाठी आजपर्यंत काहीही केले नाही उद्धव ठाकरे यांच्या सरकारने तर आरक्षणासह कुठल्याही प्रश्नावर बैठक सोडा एक शब्द कधी काढला नाही. देवेंद्रजी फडणीस यांच्या नेतृत्वातील महाविकास शासनाने आदिवासींना ज्या सोयी सवलती मिळत होत्या त्या धनगर समाजांना दिल्या. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी करण्याचा शासन निर्णय केला. सोलापूरच्या विद्यापीठाला अहिल्यादेवीचे नाव दिले. देशात पहिल्यांदाच अहिल्यानगर नाव जिल्ह्याला दिले. याबाबतीतही शरद पवार यांनी भेटलेल्या मुस्लिम समाजाच्या शिष्टमंडळांना आमचे सरकार आल्यास याबाबतीत पुर्नविचार करू असा शब्द दिला तेव्हा अहिल्यानगर हवे की पुन्हा अहमदनगर याचा समाज बांधवांनी विचार करावा.

संभाजीनगरचा संघर्ष किती वर्षापासून होता याचा विचार करून देवेंद्रजींनी आपल्याला सहजतेने मानसन्मान दिला याची जाणीव ठेवून विचारांनी मतदारांना प्रवर्त करावे असे सांगून खा विकास महात्मे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीत समाजाने संघटितपणे काम करून महायुतीचे उमेदवार आमदार रमेश आप्पा कराड यांना प्रचंड बहुमताने विजयी करावे या विषयात सर्वांचा सहभाग मोठा असावा असे बोलून दाखवले.

महायुती शासनाने राज्यातील प्रत्येक समाजासाठी महामंडळ स्थापन करून त्या त्या समाजाचा आर्थिक स्तर उंचावण्याचे काम केले आहे जेवढे भाजपने दिले तेवढे (पान ७ वर)

दैनिक
यशवंत
मंगळवार दि.१२ नोव्हेंबर २०२४
२
अहमदपूर/चाकूर परिसर
E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७

प्रभावती गबाळे यांचे दुःखद निधन



त्यांच्या दुःखद निधनाबद्दल सर्व स्तरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

अहमदपूर दि.११(बालाजी कारामुंगीकर): प्रभावती गबाळे यांचे दुःखद निधन झाले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर येथील एकनाथ किराणाचे मालक लक्ष्मणराव गबाळे यांच्या सुविध्य पत्नी सौ. प्रभावती लक्ष्मणराव गबाळे यांचे अल्पशा आजाराने दि.१० रोजी रविवारी सांयकाळी ५.०० वाजता वयाच्या ८० व्या वर्षी राहत्या घरी दुःखद निधन झाले.

त्यांच्यावर दि. ११.११.२०२४ रोज सोमवारी सकाळी ११ वाजता मध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणामध्ये सार्वजनिक स्मशानभूमी मध्ये अत्यंत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन मुलगी, सून, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार असून किराणा व्यापारी धोंडीबा लक्ष्मणराव गबाळे यांच्या त्या मातोश्री होत.

मतदार संघातील सामान्य नागरीकांना दिलेल्या धोक्यासाठी उत्तम पर्याय म्हणून मी उभा आहे

अहमदपूर-चाकूर विधानसभेचे अपक्ष उमेदवार माधव जाधव यांचे प्रतिपादन





अहमदपूर दि. ११ (प्रतिनिधी) मतदार संघातील दोन्ही पाटलांनी सामान्य जनतेला दिलेला धोक्यासाठी मी एक उत्तम पर्याय म्हणून निवडणुकीला थांबलो असुन अठरा पगड जाती आणि बारा बलुतेदार यांचे प्रश्न सोडविण्यासाठी अहमदपूर-चाकूर मतदार संघातील सर्वसामान्य जनतेने मला प्रचंड मतांनी निवडुन द्यावे असे प्रतिपादन अहमदपूर-चाकूर विधानसभेचे अपक्ष उमेदवार माधव जाधव यांनी जाहीर सभेत केले.

ते येथील निजवंत नगर येथे दि. ११ नोव्हेंबर २०२४ रोजी आयोजित केलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. जाहीर सभेच्या सुरुवातीला सकाळी ११ वाजता निजवंते नगर अहमदपुर येथुन शहरातुन मुख्य रस्त्यावरुन भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नंतर या भव्य रॅलीचे जाहीर सभेत रुपांतर झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थनी ह.भ.प. मारोती महाराज धुळगुंडे लेंडेगावकर उपस्थित होते तर यावेळी व्यासपीठावर गिरीधर पौळ उपसरपंच खंडाळी, शिवकुमार हिप्परगे सरपंच परचंडा, विश्वनाथ कोळसुरे संस्थापक अध्यक्ष कुणबी सेना, लातुर, धोंडीराम मुठ्ठे, तानाजी कवडे, तालुका कार्याध्यक्ष लहुजी सेना, चाकुर, इब्रोज पटवेगर, माधव जाधव यांचे आई-वडील, बंधु माणिकराव जाधव यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

जाहीर सभेत पुढे बोलताना माधव जाधव म्हणाले की, जाहीरनामा मी प्रत्येक घरोघर पोहचविला आहे. जाहीरनाम्यात एमआयडीसी मध्ये सोयाबिन प्रोसेसिंग असेल, ऊसावरचा गुळ उद्योगाचा असेल, तुरीचे डाळमीलचा उद्योग असेल, कच्चा माल जो उपलब्ध आहे तो पक्का कसा करता येईल, पक्क्या मालासाठी गुंतवणुक करणारे व्यापारी उपलब्ध करुन देणार आहे, यातुन बेरोजगार तरुण, तसेच महिलांना रोजगार मिळणार आहे, आदरणीय खंदाडे साहेब हे तळागाळातील सामान्य कुटुंबातुन आलेले आहेत. आमदार राहिलेले आहेत. आणखीणही त्यांची तळागाळाशी नाळ जुडलेली आहे, आणि त्यांना सर्वसामान्यांचा आवाज ओळखु येतो, ऐकु येतो, माधव जाधव कडे एक उत्तम पर्याय म्हणून आज जनता बघत आहे. जनतेला कळुन चुकलय की या दोन्ही पाटलांना सोडून माझ्या सोबत सर्वसामान्य जनता राहणार आहे. प्रस्थापित आमदारांनी ३५०० हजार कोटीचा निधी आणला पण हा निधी कमिशन खाऊन या निधीचे वाटोळे केले. तालुकयातील कोणत्याच गावाला रस्ता व्यवस्थीत झाला नाही ना कुठलाच विकास झाला नाही. मतदारांनी जर मनात आणुन मला आमदार केले तर निधीतुन कमीशन खाणारा आमदार माधव जाधव होणार नाही. मी पुरोगामी विचाराचा आहे पुरोगामी विचारामध्ये कधीच भारतीय जनता पार्टी बसत नाही. काँग्रेस असेल, राष्ट्रवादी असेल त्यांना मी भविष्यात पाठींबा देणार आहे. आणि मी त्याच विचारात राहणार आहे. अजिबात भारतीय जनता पार्टीमध्ये जाणार नाही. मी माझ्या आई वडिलांना देव मानतो माझ्या आई वडिलांची शपथ घेऊन सांगतो की कोणाच्या विरोधात उभा राहिलेलो नाही. छत्रपती शिवाजी महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे, अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा घेऊन पुढे आलोय माधव जाधव हा माधवराव जाधव किंवा साहेब होणार नाही सर्व सामान्यांना सहज उपलब्ध होणारा मी लोकप्रतिनिधी आसणार आहे. आमचे कुटुंब पुर्वी हैद्राबाद येथे राहत होते आम्ही अत्यंत हालाखीच्या परिस्थितत जिवन जगले असुन माझे आई वडील तर विट भट्टीवर मोल मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत असत. सन २०१७ मध्ये सन्मानिय शरदचंद्र पवार साहेब यांच्या मुळे राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षातुन जि.प मतदार संघ खंडाळीतुन निवडणुक लढवुन जिंकुन येऊन पाच वर्षे ग्रामीण भागातील गोरगरीब जनतेचे प्रश्न जिल्हा परिषदेच्या माध्यमातुन मांडून प्रामाणिक पणे ते सोडवण्याचा प्रयत्न केला असल्याचे सांगीतले. मला कोणावर टिका करायची नाही, माझ्यावर सोशल मिडिया मधुन माझ्यावर काहीजन वैयक्तिक खालच्या दर्जाची टिका टिप्पनी करत आहेत. त्यांनी सोशल मीडियावर टिका न करता हिम्मत असेल तर कॉलेज रोडवरील माझ्या स्वराज ट्रॅक्टरच्या कार्यालयात येवून बोलावे. मी उत्तर देण्यास समर्थ आहे. माझा सगळ्यात मोठा आधार माझे आई वडील माझा पाठीराखा भाऊ. मला निवडून आणायला सामान्य जनतेचे असंख्य हात आहेत. अहमदपूर-चाकूर तालुक्याची जनता सर्वसामान्याच्या पाठीमागे उभे राहाणार आहे. बारा बलुतेदार आठरा पगड जातीतील लोकांचे ऐरणीवरील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचा आवाज शासनापर्यंत पोहचवण्यासाठी प्रस्थापितांच्या विरोधात उभे राहण्यासाठी ताकत मला सर्वसामान्य जनतेनी दिली असुन निवडूण देण्याचे ठरवले आहे मी पुरोगामी विचाराचा वारसा घेऊन जनतेसाठी उभा आहे म्हणुन निवडणुक विभागाच्या बॅलेट यंत्रावर माझा १८ हा क्रमांक आला आहे आणि भारतीय समाजातील १८ पगड जातीसाठी मी कार्य करणार करणार आहे या योगायोगाला सत्यात उतरवण्यासाठी मला येणाऱ्या २० तारखेला रोड रोलर हे बटन दाबुन प्रचंड मतांनी विजयी करा असेही आवाहन शेवटी माधव जाधव यांनी केले.

अध्यक्षीय समारोप ह.भ.प. मारोती महाराज धुळगुंडे लेंडेगावकर यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर जाधव यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रताप गवळे यांनी मानले. रॅली व जाहीर सभेस असंख्य जनता, कार्यकर्ते उपस्थित होते.

गुरुराज माऊली च्या गजरात राष्ट्रसंतांची भक्ती स्थळ ते कपिलाधार पदयात्रा मार्गस्थ



अहमदपूर दि.११(बालाजी कारामुंगीकर): गुरुराज माऊली च्या गजरात राष्ट्रसंतांची भक्ती स्थळ ते कपिलाधार पदयात्रा मार्गस्थ झाली.

याबाबत अधिक माहिती अशी की, गुरुराज माऊली शिवलिंग माऊली च्या नामघोषात श्रीक्षेत्र भक्ती स्थळ ते चापोली ते कपिलाधार पदयात्रा भक्ती स्थळावरून हजारो भक्तगणासह मार्गस्थ झाली महापद यात्रेचे ७० वे वर्ष असून राष्ट्रसंतांचे संजीवन समाधी असलेल्या भक्तिसळापासून चापोली चाकूर वडवळ जानवळ कारेपूर पानगाव अंबाजोगाई लोखंडी सावरगाव केज होळ मार्गे श्रीक्षेत्र कपिलधार येथे कार्तिक पौर्णिमेच्या दिवशी १५ नोव्हेंबर रोजी पोहोचणार आहे या पदयात्रेत राष्ट्रसंत डॉक्टर शिवलिंग शिवाचार्य महाराज यांचे उत्तर अधिकारी राजशेखर गुरु शिवलिंग शिवाचार्य महाराज संगणबसप्पा शिवाचार्य महाराज निलंगा मठ शंकर लिंग शिवाचार्य महाराज शिरूरअंत पालकरप भक्ती स्थळाचे प्रमुख आचार्य गुरुराज स्वामी राजेश्वर स्वामी कुरळेकर बसवराज स्वामी चिंचोलीकर सहशिवाचार्य सहभागी झाले असून अहमदपूर येथे शिवाजी चौक ते वीरमठ संस्थान पर्यंत मिरवणूक काढण्यात आली भक्ती स्थळ येथे प्रसाद व्यवस्था हैबतपुर तोंडारकर यांच्या वतीने करण्यात आले होते तर वीरमट संस्थान येथे शेटकर महाजन परिवाराच्या वतीने महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती या महापद यात्रेत ६० दिंड्या सहभागी झाले असून चापोली व चाकूर या ठिकाणाहून ही अनेक दिंड्या सहभागी होत असतात या पदयात्रेत सहभागी व्हावे असे आव्हान पदयात्रेचे अध्यक्ष मनमत आप्पा पालापुरे भगवंतराव पाटील चांबर्गीकर निळकंठ बिराजदार संजय ऊसतुर्गे कपिल मल्लीशे हावगी देवने अशोक शेळगावकर यांनी केले आहे.

जात वैधता प्रमाणपत्र हरवले आहे.

शिंदे भारत तोलबा या नावाचे संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, समिती क्र. १, लातूर च्या वतिने प्रकरण क्र. ६७०/१२ दि. १६ जानेवारी २०१२ रोजीचे जात वैधता प्रमाणपत्र अहमदपूर ते शिरुर ताजबंद प्रवास करत असताना अहमदपूर बस स्टँडवर हरवले आहे.

सदरील जात वैधता प्रमाणपत्र कोणास सापडल्यास खालील मोबाईलवर संपर्क करवा.

मो. नं. ९०२८०४९९७०

निवडणूक निरीक्षक साकीत मालवीया यांची फॅसिलिटेशन सेंटरला भेट



अहमदपूर दि.११(बालाजी कारामुंगीकर):निवडणूक निरीक्षक साकीत मालवीया यांनी फॅसिलिटेशन सेंटरला भेट दिली.

याबाबत अधिक माहिती अशी की, निवडणूक निरीक्षक साकीत मालवीया यांची अहमदपूर विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी होणाऱ्या दुसऱ्या प्रशिक्षण स्थळी फॅसिलिटी सेंटर प्रसाद गार्डन येथे भेट देऊन पाहाणी केली.

याचबरोबर महात्मा गांधी कॉलेज मध्ये १२ वर्ग खोल्यांमध्ये चालू असलेल्या हँडसमला भेट देऊन आवश्यक त्या सर्व सुविधासाठी सूचना केल्या. सर्व मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांनी स्वतः हँडसम करून बघावे व सर्व शंका दूर कराव्यात तसेच इतर अत्यावश्यक सूचना दिले. किनगाव येथील मतदान केंद्रांना भेट देऊन ए एम एफ सुविधांची पाहणी केली.सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांची बैठक घेऊन त्यांना सिलिंग प्रक्रियेबद्दल गृह मतदानाबद्दल माहिती देऊन सदर प्रक्रिया वेळी हजर राहणे याबाबत माहिती दिले.

यावेळी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा लटपटे, गटविकासअधिकारी अमोल कुमार आंदेलवाड, मास्टर ट्रेनर,इतर निवडणूकीतील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चापोलीच्या विकासासाठी कटिबद्ध : आ. बाबासाहेब पाटील



चापोली दि.११ (प्रतिनिधी): चापोलीच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन आ. बाबासाहेब पाटील यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की,चापोली येथे राष्ट्रीय महामार्गाचे प्रश्न सोडवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला,बोगद्याचा विषय सोडवण्याचा प्रयत्न केला. चापोलीच्या विकास कामासाठी भरिव निधी देऊन चापोलीचा विकास करण्याचा प्रयत्न केला व भविष्यात सुद्धा चापोलीच्या विकासासाठी मी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन चाकूर अहमदपूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा महायुतीचे उमेदवार बाबासाहेब पाटील यांनी चापोली येथे केले.

ते चापोली येथे आयोजित जाहीर सभेत बोलत होते यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष अर्जुन मद्रेवार, भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ माने, भाजप प्रदेश उपाध्यक्ष युवराज पाटील, जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे, दयानंदराव सुरवसे, तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे, वसंत डीगोळे,खंडेराव वाघ,मुजीब पटेल, महायुतीचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

मतदार संघाच्या भवितव्यासाठी बाबासाहेब पाटलांना निवडून द्या : दिलीपराव देशमुख

अहमदपूर चाकूर मतदार संघाच्या भवितव्यासाठी आमदार बाबासाहेब पाटील यांना पुन्हा आपल्याला विधानसभेत पाठवायचं असून सर्वसामान्य महिलेला हनुमान देण्याचं काम आपल्या भाजप महायुती सरकारने केली आहे यामुळे पुन्हा एकदा आपण महायुतीचे उमेदवार बाबासाहेब पाटील यांना चापोलीतून प्रचंड मताधिक्य दूध विजयी करावे असे आवाहन भाजपचे जिल्हाध्यक्ष दिलीप देशमुख यांनी केले.

सर्वसामान्यांसाठी झटणाऱ्या नेत्याला विधानसभेत पाठवा : गोपाल माने

अहमदपूर चाकूर विधानसभा मतदारसंघातल्या सर्वसामान्य जनतेसाठी सतत झटणाऱ्या आमदार बाबासाहेब पाटील यांना पुन्हा विधानसभेत पाठवा असे आवाहन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाळ माने यांनी केले.

विनायकरावच्या भूलथापाला मुस्लिमांनी बळी पडू नये : मुजीब पटेल

जे विनायकराव भाजप मध्ये असताना यएन आर सी लागू करण्यासाठी आंदोलन करत होते अशा विनायकराव पाटलाच्या भुलतापाला मुस्लिम मतदार बंधू-भगिनींनी बळी पडू नये व सर्व मुस्लिम बांधवांनी बाबासाहेब पाटील यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे राहावे असे आवाहन अहमदपूर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष मुजीब पटेल यांनी चापोलीच्या जाहीर सभेत केले. यावेळी मिलिंद महालिंगे, दयानंद सुरवसे, टी एन कांबळे, सुनील सूर्यवंशी आदींची समायोजित मनोगते झाली.

दैनिक यशवंत
नियमित वाचा

कबीरवाणी

क्रोध अग्नि घर घर बढी,
जलै सकल संसार।
दीन लीन निज भक्ति जो,
तिनके निकट उबार ॥

भावार्थ: संत कबीर सांगतात की, समाजामध्ये प्रत्येकांच्या घरा घरा मधुन क्रोधाग्नी वाढलेला आहे. आणि हे संपुर्ण विश्व त्यात जळून भस्म होत आहे. परंतु जो विनंम्रमपणे आपल्या भक्तीत मंत्रमुग्ध आहे, लीन आहे. त्याच्या संगतीत जीवनाचा उद्धार आहे. म्हणून संत कबीरांनी सांगितले आहे क्रोधावर नियंत्रण असणे खुप आवश्यक आहे. जो व्यक्ती आपलया क्रोधावर नियंत्रण ठेवतो तोच व्यक्ती जीवनामध्ये यशस्वी होतो. या धावपळीच्या युगामध्ये हा दोहा खुप महत्वाचा आहे. छोट्या छोट्या कारणावरुन भांडणे करणारी माणसे आपल्या आवतीभोवती खुप मोठ्या प्रमाणात दिसत आहेत. संत कबीरांची किती मोठी दुरदृष्टि होती यावरुन हे दिसुन येते.

आज आधुनिक युगात मानव खुप प्रगती केली आहे मात्र तो क्रोध, मत्सर, व्देश, अहंकार यामध्ये तो रात्रंदिवस जळत आहे. यासाठी हे सर्व निष्फळ आहे.

अग्नीचा गुणधर्मच आहे जाळुन खाक करणे मग तुम्ही प्रत्यक्ष जळुन खाक व्हा किंवा क्रोध, मत्सह, अहंकारानी जळुन जा. मात्र तो यापासून दूर राहातो त्याचे जीवन सार्थक होते.

डॉ. बालाजी कारामुंगीकर
गोविंदराव
मो. ९८२३११२९०७

यशवंत
धाराशिव जिल्हा
मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

कळंब येथे चर्मकार समाजाचा अजित पिंगळे यांना पाठिंबा

कळंब दि.११ (प्रतिनिधी) – कळंब येथे चर्मकार समाजाची बैठक राष्ट्रीय चर्मकार महासंघ जनसंपर्क कार्यालय कळंब येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मराठवाडा युवक अध्यक्ष विकास कदम होते. यावेळी या बैठकीत शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार अजित बप्पासाहेब पिंगळे यांना पाठिंबा जाहीर करण्यात आला. यावेळी अजित पिंगळे यांच्या प्रयत्नातून श्री संत गुरु रविदास महाराज येथे सभामंडपाचे काम पार पडले. त्याचप्रमाणे मागील काळातदेखील समाजाच्या विविध अडीअडचणीमध्ये अजित पिंगळे यांचे सहकार्य लाभले. यामुळे कळंब शहरातील सर्व चर्मकार समाज बांधवांनी पिंगळे यांना पाठिंबा जाहीर दिला. यावेळी मराठवाडा युवक अध्यक्ष विकास कदम यांनी पिंगळे यांना अधिकाधिक मताधिक्याने निवडून द्यावी असे आवाहन केले. यावेळी चर्मकार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन मिळणार - आ. पाटील

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – शेतकऱ्यांना खतावरील एसजीएसटी कर परत मिळणार असून सोयाबीनला प्रती क्विंटल ६ हजार रुपये भाव देण्यात येणार आहे. तर राज्यातील १० लाख विद्यार्थ्यांना १० हजार रुपये विद्यावेतन देण्यात येणार असल्याचा संकल्प महायुतीच्यावतीने करण्यात आल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिनांक रोजी दिली.
धाराशिव येथील प्रतिष्ठान भवनमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी दत्ताभाऊ कुलकर्णी, नितीन काळे, नेताजी पाटील व युवराज नळे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ पाटील म्हणाले की, लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्यात येणार आहेत. तर शेतकऱ्यांना कर्जमाफी व सन्माननिधी मध्ये १२ हजार ऐवजी १५ हजार रुपये तसेच एमएसपीवर २० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक गरिबांचे स्वप्न पूर्ण होईल यासाठी अन्नसुरक्षा व हक्काचे घर देण्यात येईल. वृद्ध पेन्शन धारकांचे मानधन महिन्याला २१०० रुपये देण्यात येणार आहेत. तसेच राज्यात जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर राहणार आहेत. तसेच अंगणवाडी व आशा स्वंयसेविकांना १५ हजार रुपये वेतन व विमा संरक्षण देण्यात येणार असून वीज बिलात ३० टक्के कपात करण्यासह सौर व अक्षय उर्जेवर भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तर सरकार स्थापनेनंतर १०० दिवसांच्या आत व्हिजन महाराष्ट्र २०१८ सादर करण्यात येईल. तर राज्याला एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्याचे लक्ष भाजपा करणार आहे. तसेच मेक इन महाराष्ट्र राज्याला फिटनेस व –ख ची राजधानी नागपूर, पुणे, नाशिक सारखी शहरे एयरोस्पेस हब बनवेल असे त्यांनी सांगितले. तर २०२७ पर्यंत ५० लाख महिलांना देण्यात येणार असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले. तर युवकांसाठी स्वामी विवेकानंद युवा स्वास्थ्य कार्ड देऊन वार्षिक आरोग्य तपासणी करण्यात लखपती दीदी बनवणार असून ५०० बचत गटांसाठी १ हजार कोटींचा फिरता निधी उपलब्ध करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच एससी, एसटी व ओबीसी समाजातून उद्योजक घडविण्यासाठी १५ लाख रुपये पर्यंतचे बिनव्याजी कर्ज येणार आहे. महाराष्ट्राच्या गौरवशाली किल्ल्यांची संवर्धन व ऐतिहासिक वर्षाचे जतन करण्यात येणार असून ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राधान्य धोरण आधार सक्षम सेवा व शासकीय रुग्णालयांमध्ये स्वतंत्र उपयोगी सुरु करण्यात येणार आहे. तसेच फसव्या धर्मांतराला आळा बसविण्यासाठी सक्तीचा धर्मांतर विरोधी कायदा करण्यात येणार आहे. तर आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानव, वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे आ पाटील यांनी सांगितले.

महायुतीचा जाहिरनामारुपी संकल्प



शैलेश वसंतकुमार मेहता यांचे निधन

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – शहरातील प्रतिष्ठित व्यापारी मेहता इंजिनिअरिंग कंपनी चे मालक शैलेश वसंतकुमार मेहता (वय ६४ वर्षे) यांचे निधन दि.१० नोव्हेंबर रोजी दुपारी १.२० वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,



२ मुली, ३ पुतणे, भावजयी, सून नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर दि.११ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता कपिलधार स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, शहरातील व्यापारी, रोटरी क्लबचे पदाधिकारी व मित्र परिवार उपस्थित होते.

केंद्रातील मोदी सरकारच्या धोरणांमुळे शेतकरी, पशुपालक संकटात आ.पाटील

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – देशाच्या सत्तेवर दोन व्यापारी बसले असून राज्यात त्यांचे तीन छोटे व्यापारी आहेत. यांच्या व्यापारी धोरणामूळ जनतेला भिकारी व्हायची वेळ येत असल्याचा घणाघात आमदार कैलास पाटील यांनी केला आहे.
धाराशिव तालुक्यातील खानापूर येथे आयोजित सभेत उमेदवार आ. कैलास पाटील यांनी केंद्रातील मोदी सरकारवर जबर टीका करत त्यांचे धोरण शेतकरी, पशुपालक, आणि सर्वसामान्य जनतेला कसे हानीकारक ठरले असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी आमदार पाटील म्हणाले मोदी सरकारच्या निर्णयांमुळे देशातील दुधाचे दर मोठ्या प्रमाणात कोसळले आहेत. पूर्वी जनावरांच्या पेंड पोते अकराशे रुपयाला होते तेव्हा दुधाला दर ३५ रुपयापर्यंत मिळत होता. मात्र आता, पेंडची किंमत १८०० रुपयांपर्यंत पोहोचली असतानाही दुधाचे दर फक्त २२ ते २५ रुपयावर आहेत. ही गंभीर समस्या परदेशातून दुधाची भुकटी आयात केल्यामुळे निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या खिशातून पैसे काढून बाहेरील व्यापाऱ्यांचे खिसे भरले जात आहेत. दुधाला अनुदान देण्याच्या सरकारच्या घोषणांवरही त्यांनी ताशेरे ओढले. अनुदान देण्याचे केवळ मोठे बोल करून केंद्र सरकारने एक रुपयासुद्धा दिला नाही. हा शेतकऱ्यांचा अपमान आहे. आपले शेतकरी आणि पशुपालक मोठ्या संकटात असताना, सरकार केवळ घोषणा करत बसले आहे,असे त्यांनी सांगितले.
सोयाबीनच्या दरावरील घसरण हाही एक गंभीर प्रश्न असून त्यावरही आ. पाटील यांनी सरकारला दोष दिला. सोयाबीनचे आधारभूत मूल्य ४९०० रुपये निश्चित केले आहे, पण शेतकऱ्यांना केवळ रु. ३८०० चा दर मिळत आहे. सरकारने हमीभाव केंद्र सुरू करण्याची घोषणा केली होती, मात्र ती केंद्रे उशिरा सुरू झाली. शेतकऱ्यांना आपल्या कष्टाचा संपूर्ण मोबदला मिळायला हवा. पण सरकार व्यापाऱ्यांच्या फायद्याची तजवीज करत आहे. व्यापारी मात्र सोयाबीन खरेदीमध्ये हात मारत आहेत, तर शेतकऱ्यांना त्याचा फटका बसत आहे. आ. पाटील यांनी अधिक आक्रमक भाषेत सांगितले, ज्या देशाचे राजे व्यापारी असतात, त्या देशातील प्रजा भिकारी बनते, अशी परिस्थिती भारतात तयार होत आहे. गुजरातमधील दोन व्यापारी भारताच्या अर्थकारणावर पूर्णपणे नियंत्रण घेत आहेत, तर महाराष्ट्रात तीन इंजिनयुक्त मिंधे आपल्या जनतेला गरीब बनवत आहेत. हे सरकार फक्त मूठभर व्यापाऱ्यांच्या फायद्यासाठीच काम करत आहे आणि शेतकऱ्यांची, गरीबांची फसवणूक करीत आहे. यावेळी त्यांनी मतदारांना आवाहन केले की, हे अपयशी सरकार आता सत्तेवरून हकालून लावा. महायुतीला हटवून महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणा. आपण आपल्या अधिकाराचा वापर करून ही अन्यायाची सत्ता उलथून लावू शकता. मशाली समोरील बटन दाबा आणि आपल्या न्यायाच्या लढ्यात महाविकास आघाडीला पाठिंबा द्या,असे करत त्यांनी मतदारांना बदलाची हाक दिली.



व्हाईस मेसेज व एसएमएस प्रसारीत करण्यासाठी परवानगी घेणे आवश्यक

ध्वनिचित्रफीत आणि ध्वनीफितीचे प्रमाणिकरण अनिवार्य

धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा आता वेग वाढत आहे. विविध राजकीय पक्षांचे व अपक्ष उमेदवार आपल्या मतदार संघातील जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी विविध माध्यमांचा वापर करत आहेत. उमेदवार मतदारापर्यंत पोहचण्यासाठी त्यांच्या आवाजातील ध्वनी संदेश (व्हाईस मेसेज) आणि लघु संदेश (एसएमएस) मतदारांच्या भ्रमणध्वनी पाठवू शकतात. परंतू हे संदेश मतदारांपर्यंत प्रसारीत करण्यापूर्वी संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या शिफारशीसह जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व माध्यम संनियंत्रण समितीची (एमसीएमसी) परवानगी घेणे आवश्यक आहे. या संदर्भात कार्यरत असणाऱ्या एजन्सी तसेच उमेदवारांनी ही बाब लक्षात घ्यावी.
विनापरवानगी इलेक्ट्रॉनिक्स फॉरमॅटमधील कोणत्याही प्रसिध्दी साधनाचा व प्रसिध्दी तंत्राचा वापर करण्यावर निवडणूक आयोगाने प्रतिबंध केला आहे.याचा फटका उमेदवाराच्या खर्चाच्या ताळमेळाला बसू शकतो. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त केलेल्या खर्च सनियंत्रण विभागाकडून यासंदर्भात सूचना जारी केल्या आहेत. उमेदवारांना प्रसिध्दी विषयक कोणतेही साहित्य वापरताना माध्यम प्रमाणिकरण व सनियंत्रण समितीची (एमसीएमसी) परवानगी अनिवार्य असल्याचे स्पष्ट केले आहे.
राजकीय पक्ष व उमेदवारांनी दूरचित्रवाणी वाहिन्या, केबल नेटवर्क, केबल वृत्तवाहिन्या, सिनेमा हॉल, रेडिओ, सार्वजनिक तसेच खासगी एफएम चॅनेल्स, सार्वजनिक ठिकाणी दाखविण्याच्या दृक-श्राव्य जाहिराती, ई-वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध करावयाच्या जाहिराती, बल्क लघु संदेश (बल्क एसएमएस), रेकॉर्ड केलेले ध्वनिफीत (व्हॉईस मेसेजेस), सोशल मीडिया, इंटरनेट संकेतस्थळे यावर दर्शविण्याच्या सर्व जाहिरातीची परवानगी घेणे आवश्यक आहे.
२० नोव्हेंबर या मतदानाच्या दिवशी व त्याच्या एक दिवस अगोदर म्हणजे १९ नोव्हेंबर रोजी वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातीचे माध्यम प्रमाणिकरण आणि माध्यम संनियंत्रण समितीकडून (एम.सी.एम.सी.) पूर्व प्रमाणीकरण करून घेणे आवश्यक आहे. यासाठी विहित नमुन्यातील अर्ज उपलब्ध आहे. जाहिरात प्रसारित होण्याच्या ४८ तास अगोदर राजकीय पक्ष, उमेदवार किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी जाहिरात प्रमाणीकरणासाठी जाहिरात व अर्ज सादर करावा. अनोंदणीकृत राजकीय पक्ष किंवा इतर व्यक्तींनी किमान ७ दिवसांपूर्वी समितीकडे अर्ज करणे आवश्यक आहे. माध्यम प्रमाणीकरण व माध्यम सनियंत्रण समिती अर्थात एमसीएमसी समिती ही अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो अर्ज ४८ तासात निकाली काढेल. एमसीएमसी समितीने जाहिरातीत बदल सुचविल्यानंतर समितीकडून तसा संदेश प्राप्त झाल्याच्या २४ तासांत राजकीय पक्ष किंवा उमेदवाराने त्यानुसार दुरुस्त्या करून नवीन निर्मित केलेली जाहिरात प्रमाणीकरणासाठी सादर करणे आवश्यक आहे. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक लढविणाऱ्या सर्व पक्ष आणि उमेदवारांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन माध्यम प्रमाणीकरण व माध्यम संनियंत्रण समितीने केले आहे.

खा. बारणे यांची धाराशिव संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – धाराशिव येथील शिवसेना संपर्क कार्यालयाला शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांनी सदिच्छा भेट दिली. खा बारणे यांच्या या भेटीमुळे शिवसेना कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पहायला मिळाले. यावेळी जिल्हाप्रमुख सुरज साळुंके यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.
या भेटी दरम्यान धाराशिव व कळंब विधानसभा मतदार संघातील महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. विधानसभा निवडणुका तोंडावर असल्याने विविध विकास कामे, मतदार संघातील गरजा व स्थानिक पातळीवरील समस्यांचा आढावा घेण्यासाठी ही चर्चा महत्त्वाची ठरली. खा बारणे यांच्या या भेटीमुळे आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाची धोरणे व रणनीती आखण्यासाठी एक संधी मिळाली आहे. जिल्हाप्रमुख साळुंके यांनी जिल्ह्यातील राजकीय परिस्थितीवर सविस्तर माहिती देत, मतदार संघातील प्रमुख समस्या व विकासात्मक आव्हाने यावर चर्चा केली.

उध्दव ठाकरे यांची कासारशिरसी, लोहारा, धाराशिव व बार्शी येथे धडाडणार प्रचाराची तोफ



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) – औसा निलंगा विधानसभेचे उमेदवार दिनकरराव माने. उमरगा लोहारा विधानसभेचे उमेदवार प्रविण स्वामी, धाराशिव कळंब विधानसभेचे उमेदवार कैलास घाडगे पाटील. बार्शी विधानसभेचे उमेदवार दिलीपराव सोपल यांच्या प्रचारार्थ जाहिर प्रचार सभा होणार आहेत. या सभेत ठाकरे यांच्या तोफा धरणार असून ते काय बोलणार ? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहेत.
महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांची मुलुख मैदानी तोफ कासारशिरसी, लोहारा, धाराशिव व बार्शी येथे दि. १२ नोव्हेंबर रोजी धडाडणार असून खास विरोधकांचा ठाकरे शैलीत समाचार घेणार आहेत. औसा निलंगाचे उमेदवार दिनकर माने यांच्या प्रचारर्थ कासार शिरसी येथे सकाळी १० वाजता सभा होणार आहे. त्यानंतर उमरगा लोहारा विधानसभेचे उमेदवार श्री. प्रविण स्वामी यांच्या प्रचारार्थ लोहारा येथे दुपारी १२ वाजता शंकरराव जावळे पाटील महाविद्यालय लोहारा येथे सभा होईल. त्यानंतर कळंब धाराशिव विधानसभेचे उमेदवार कैलास घाडगे पाटील यांच्या प्रचारार्थ कन्या प्रशाला,शहर पोलीस स्टेशन समोर, धाराशिव येथे सायं. ५ वाजता सभा होणार आहे. बार्शी विधानसभेचे उमेदवार दिलीपराव सोपल यांच्या प्रचारार्थ सायं. ७ वा. गांधी चौक मैदान, बार्शी येथे जाहिर सभा होणार आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील सर्व घटक पक्षाच्या कार्यकर्ते व नागरीकांनी या सभेस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन केले आहे.

गरीब माणसाला व शेतकऱ्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी पिंगळे यांना निवडून द्या - खा. बारणे

कळंब दि.११ (प्रतिनिधी) – शिवसेना महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे हे गरीब माणूस आणि शेतकऱ्यांसाठी विविध योजनांद्वारे विकासात्मक कामे करणारे आणि जनतेच्या कामांत नेहमी तत्पर असणारे नेते आहेत. त्यांना निवडून देण्याचे आवाहन खासदार श्रीरंग बारणे यांनी कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे आयोजित सभेत केले.
पुढे बोलताना खा. बारणे म्हणाले की, अजित पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली ग्रामीण भागातील गरीब आणि शेतकरी वर्गाला विविध योजनांचा लाभ मिळेल. त्यांनी नेहमीच समाजाच्या तळागाळातील घटकांच्या हितासाठी काम केले आहे. त्यांनी पिंगळे यांच्या नेतृत्वाचे कौतुक करताना असेही नमूद केले की, विकासाच्या मुख्य प्रवाहात या घटकांना सहभागी करून घेणे ही महायुतीची प्राथमिकता असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी विविध सवलती, आर्थिक मदत आणि शेतमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्याचे प्रयत्न होणार आहेत. अजित पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली या कामांना गती मिळेल. त्याबरोबरच
खा बारणे म्हणाले की, अजित पिंगळे यांना निवडून देऊन गावाच्या आणि शेतकऱ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी समर्थन द्यावे. महायुतीचे उमेदवार अजित पिंगळे यांनी आपल्या मतदार संघातील नागरिकांना थेट आवाहन करत, तुमच्या गावासह संपूर्ण मतदार संघाच्या विकासासाठी मला निवडून द्या, असे आवाहन त्यांनी केले. मी एक सर्वसामान्य आणि निष्ठावंत माणूस आहे, आणि आपल्या मतदार संघाचा विकास आणि प्रगती घडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन पिंगळे यांनी दिले.
अजित पिंगळे यांनी मतदारांशी संवाद साधताना आपल्या योजना आणि उद्दिष्टे याबाबत माहिती दिली. महायुतीचे सरकार सत्तेत आल्यास आम्ही प्रामाणिकपणे विकासाची नवी दिशा आणू. आपल्या गावातील पायाभूत सुविधा, शिक्षण, रोजगार आणि आरोग्य यावर विशेष लक्ष केंद्रित करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच, सर्वसामान्यांच्या समस्या सोडवणे आणि त्यांना न्याय देणे हे माझे कर्तव्य असेल. मी निवडून आलो तर पारदर्शक व प्रगतीशील प्रशासनाची हमी देतो. आपल्या मतांच्या माध्यमातून गाव व संपूर्ण मतदार संघाच्या विकासात योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



शासनाने एफ.आर.पी. वाढवली पण साखरेचे दर वाढवले नाहीत

माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सरकारवर टीका

लातूर/ देवणी - केंद्र शासनाने एफ.आर पी.चे दर वाढवले पण साखरेचे व ऊत्पादीत मालाच्या भाववाढीत खोडा घालण्याचे काम सरकारने कौशल्याने केले असल्याची खरमरीत वास्तव टिका जागृती शुगरचे संस्थापक चेअरमन तथा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी केली. ते देवणी तालुक्यातील तळेगाव येथील जागृती शुगर ॲड अलाईड ईंडस्ट्रिजच्या १३ व्या गाळप हंगाम शुभारंभ प्रसंगी ते रवीवारी बोलत होते .

या प्रसंगी व्यासपीठावर जागृतीचे व्हाईस चेअरमन लक्ष्मण मोरे रेणाचे माजी चेअरमन आबासाहेब पाटील जिल्हा बॅकेचे संचालक दिलीप पाटील नागराळकर गजानन भोपनिकर, मांजरा परिवाराचे माध्यम समन्वयक हरिराम कुलकर्णी, सुग्रीव लोंढे सोनू डगवाले , मालवा घोनसेबालाजी बोंबडे यांची प्रमुख ऊपस्थीती होती .

सध्याचे सरकार शेतकऱ्यांच्या बाबतीत उदासीन या वेळी बोलतांना माजी मंत्री दिलीपराव



देशमूख म्हणाले की सध्याचे शासन शेतक-यांच्या हितासाठी ऊदासीन भुमीकेत असून एकीकडे एफ आर.पीचे भाव वाढवाचे मात्र दूसरीकडे साखरेचे दर मात्र वाढवायचे नाहीत सोयाबीन सह ऊत्पादीत मालाची भाववाढीत खोडा घालण्याचे कार्य सत्ताधारी शासन करीत आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले जागृति शुगर ने एफ आर पी पेक्षा ७२ कोटी रुपये जास्तीचे दिले .

यावेळी बोलताना दिलीपराव देशमुख म्हनाले की सामजिक बांधीलकी म्हणुन एक पाऊल पुढे टाकून आम्ही जागृतीने एफ आर.पी.पेक्षा ७२ कोटी रूपये जास्तीचे देऊन जागृतीच्या सभासद शेतक-यांना दिले व शेतक-यांसह परीसरातील देवणी ऊदगीर, निलंगा शि.अनतपाळ तालूक्यातील बाजारपेठेसह शेतमजूर कामगारांच्या जीवनात अर्थीक क्रांती केली आहे. त्यामुळे या भागांतील शेतकऱ्यांसह व्यापाऱ्यांना मोठी आर्थिक सुबत्ता देण्याचे काम जागृति शुगर च्या माध्यमातून झालेले आहे पुढेही होईल यात शंका नाही असेही ते यावेळी म्हणाले.

उस ऊत्पादक शेतकऱ्यांचा सत्कार

या वेळी जागृतीला जास्ती जास्त ऊस पुरवठा करणा-या शेतक-यांचाही सपत्नीक सत्कार करण्यात आला या मध्ये पाटील शकूंतला दिलीप साकोळ यांनी सर्वाधिक ९०५ मे टन ऊस पुरवठा तर द्वितीय ईटकर सुभाष भिमरार घुग्गी ८६५ मे.ट. हार्वेस्टर द्वारे मोरे मधूकर श्रीपतराव चलबुर्गा यांनी १६०८०० मे.टन.ऊस देऊन १ कोटींचा व्यवसाय केले तर ट्रक च्या माध्यमातून जाधव विजय गंगाधर यांनी २९४० मेट्रीक टन बिरादार,आकाश चद्रेशेखर हाणमंतवाडी २४४१,मे ट. पवार गणेश ऊत्तमराव ४२६०मे ट.ऊस जाधव लखन शिवाजी मुबारकपूर ३२२५ मे. टन लहाण ट्रॅक्टर मध्ये चव्हाण शेषेराव हिरामन ३०८४ मे ट. ऊस पुरवठा करणा-या ऊस पुरवठा करणा-या पुरवठा दारांचा सत्कार करण्यात आला . प्रास्ताविक प्रकल्प व्यवस्थापक येवले जी जी.यांनी केले मागील वर्षी जागृतीने दैनंदिन ५००० मे.ट. गाळप करून ७ लाख २ हजार मे.ट. गाळप केले दर २७६५ रूपये,भाव दिल्याचे सांगीतले दरवर्षी प्रमाणे याही वर्षी उस उत्पादक शेतकऱ्यांनी जागृती शुगर कडे उस गाळपास द्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले यावेळी आभार प्रा. भगवान गायकवाड यांनी व्यक्त केले.

नूतन हरवेस्टर चे पूजन यावेळी जागृती शुगर ने घेतलेल्या नूतन चार हार्वेस्टर चे पूजन. माजी मंत्री सहकार महर्षी जागृती शुगर चे संस्थापक अध्यक्ष दिलीपराव देशमुख साहेब व अन्य मान्यवर यांच्या हस्ते करण्यात आले..

गृहमतदानात १४६ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला



देगलूर (प्रतिनिधी): नांदेड लोकसभा पोटनिवडणूक देगलूर बिलोली विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी भारत निवडणूक आयोगाने दिव्यांग तसेच ८५ वर्षे वयाच्या मतदारांसाठी गृह मतदान योजना राबविली होती देगलूर बिलोली मतदारसंघात झालेल्या गृह मतदानास दिव्यांग मतदार संख्या३३ होती. यापैकी पूर्ण ३३ जणांनी मतदानाचा हक्क बजाविला. तर वय वर्ष ८५ वर्षापेक्षा जास्त असलेल्या मतदारांची संख्या १२१ त्यापैकी ११३ मतदारांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे. यात तीन जण मयत आणि पाच जण अनुपस्थित होते.दिव्यांग आणि वयोवृद्ध दोन्ही मतदारांची संख्या एकूण १५४ होती यामध्ये १४६ जणांनी मतदानाचा हक्क बजाविला आहे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्रीमती क्रांती डोंबे व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भरत सूर्यवंशी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार बिलोली गजानन शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली या गृह मतदान पथक प्रमुख तथा नायब तहसीलदार बालाजी मिठेवाड, शिक्षण विस्तार अधिकारी हमीद दौलताबादी सह नोडल अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, बीएलओ यांचा समावेश होता.

मतदान करून बोटाला शाई दाखवा व मोफत सर्विसिंग करून घ्या

व्यकंटेश्वरा हीरो मोटर्सचा स्तुत्य उपक्रम

देगलूर (प्रतिनिधी): देगलूर येथील वेंकटेश्वरा हीरो मोटर्स शोरूमद्वारे मतदार जनजागृतीच्या राष्ट्रीय कार्यात सन २०१९ पासून सक्रीय सहभाग आसून लोकसभा निवडणुक २०१९ , विधानसभा निवडणुक २०१९ आणि लोकसभा निवडणुक

२०२४ अशा एकूण तीन सार्वत्रिक निवणुकीत एकूण ४३८ मोटार सायकलची पूर्णत: त्रीशश / मोफ़त सर्विसिंग करण्यात आली आहे.एक आदर्श व्यावसायिक म्हणुन प्रमोद चौधरी हे प्रत्येक निवडणुकीत मतदाराना प्रोत्साहन देन्यासाठी मतदान करा व मोफ़त सर्विसिंग करुण घ्या हा उपक्रम राबविणार आहे.

देगलूर विधानसभा निवडणुकीत ७५ टक्के मतदानाचे ध्येय निर्धारित करण्यात आलेअसून स्विप कक्षाच्यावतीने मतदान जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. स्वीप कक्षाच्या विनंतीनुसार प्रमोद चौधरी यानी वेगळा आदर्श समाजासमोर



ठेवला आहे.देगलूर - बीदर रस्त्यावर प्रमोद चौधरी यांचे व्यर्कटेश्वरा मोटर्स हे हिरो कंपनीचे शोरूम आहे. देगलूर तहसील कार्यालयाच्या स्विपकक्षाचे मतदान जनजागृतीचे कार्य पाहून त्यांनी आपल्या शोरूमच्या माध्यमातून मतदान करून आल्यावर हिरो मोटारसायकल ग्राहकांना मोफत गाडी सव्हीसीगं करून देण्याचा अभिनव उपक्रम जाहिर केला आहे.

स्विपकक्षा मार्फत व्यवँटेश्वरा हिरो मोटर्स येथे मतदार जनजागृती मोहीम राबविण्यात आली.

यावेळी कामगारांनी स्वतः मतदान करावे याच बरोबर प्रत्येक गाडी घेऊन येणाऱ्या ग्राहकांना मतदान करण्यासाठी पावतीवर मी मतदान करनार तुम्ही पण करा असा शिक्का मारून विनंती करावी असे आवाहन केले.

प्रास्ताविकात प्रा. बी आर कतूरवार यांनी मतदानापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे असे सांगताना आपल्या शहर, राज्य, देशाच्या प्रगतीसाठी, विकासासाठी मतदान आवश्यक आहे असे म्हटले. हिरो मोटर्स च्या उपक्रमाचे स्वागत शिक्षण अधिकारी डी के तोटरे यांनी स्वागत केले यावेळी शोरूममधील कामगार , कर्मचारी ग्राहकांना मतदानजागृतीसाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले. यावेळी दररोज असंख्य ग्राहक मतदार बाईक खरेदी- दुरुस्तीसाठी येत असतात.

त्याठीकाणी दिल्या जाणा-या पावत्यावर *होय,दि. २०/११/२०२४ रोजी मी मतदान करणार- तुम्ही पण करा* असा शिक्का / स्टॅम्प मारून ग्राहक मतदाराला मतदारांची दिवसाची स्मरण केले जात आहे.

याप्रसंगी प्रा. डॉ. अभिमन्यू पाटील, बालाजी सुगावकर , शिवप्रसाद स्वामी आणि कोळनुरे भुमेश्वर उपस्थित होते.

कृतज्ञता भाव जपणारे संशोधक

डॉ. भी. शि. स्वामी : डॉ. अनिल सर्जे

सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा उत्साहात संपन्न

पुणे : वीरशैव मराठी साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. भी. शि. स्वामी यांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा पुण्यात उत्साहात संपन्न झाला. डॉ. स्वामी यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेऊन वीरशैव मराठी साहित्याचे दालन अभ्यासकांना खुले केले. वीरशैव मराठी साहित्यात त्यांनी केलेले संशोधन अत्यंत मोलाचे असल्याचे मत डॉ. अनिल सर्जे यांनी व्यक्त केले. पुणे येथे संपन्न झालेल्या डॉ. स्वामी यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन सोहळ्यात ते बोलत होते. लक्ष्मण महाराज व्यक्ती आणि वाङ्मय या विषयावरचे त्यांचे संशोधन आपणा सर्वांना मार्गदर्शक आहे. त्यांच्या गुरूंविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी एक लाख रुपये देऊन त्यांनी श्री १०८ ष. ब्र. परंडकर शिवाचार्य पत्रकारिता पुरस्कार सुरू केला. काशीपीठाचे जगद्गुरू डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आशीर्वादाने महाराष्ट्रातील अनेक मान्यवरांना हा पुरस्कार मिळत आहे.



सर्वप्रथम त्यांच्या कन्येंनी पाद्यपूजा केली. संपूर्ण परिवाराने औक्षण केले. सरांचा पणतू व्यंकटेश याला पुष्पगुच्छाच्या वर्षावाने शुभेच्छा देण्यात आल्या. डॉ. स्वामी यांनी लिहिलेला अष्टावरण, पंचाचार, षट्स्थल हा ग्रंथ तसेच श्रीफलाने त्यांचा तुलाभार करण्यात आला. सौ. विजया स्वामी यांची साखर तुला करण्यात आली.

वीरशैव मराठी साहित्याच्या ज्येष्ठ संशोधिका डॉ. श्यामा घोणसे यांनी सरांच्या कार्याचा गौरव केला. ओंकार स्वामी, प्रतिभा जगन्नाथ आगलावे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी उषा पसारकर, सुहास साळुंखे, महेश कुगावकर, चडचणकर ट्रॅव्हल्सचे मृगेंद्र चडचणकर, सोबा ऑप्टिमा सोसायटीचे सहकारी, इतर समाज बांधव, मित्र, आप्तेष्ट, नातेवाईक आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अपर्णा पंकज लहानकर, मयुरा मकरंद आगलावे, सार्थकी नितीन रेड्डी यांनी प्रयत्न केले.

मंदिराबरोबरच ज्ञानमंदिर देखील उभा करण्याची गरज - आ. पाटील

कळंब दि.११ (प्रतिनिधी) - मंदिराबरोबरच ज्ञानमंदिर देखील उभा करण्याची गरज असून आमदार कैलास पाटील यांनी प्रत्येक गावात अभ्यासिका उभारण्याचा संकल्प केला आहे. धाराशिव - कळंब मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आणि विद्यमान आमदार कैलास पाटील यांनी आगामी निवडणुकीच्या प्रचारात विद्यार्थ्यांसाठी मोठे आश्वासन दिले आहे. कळंब तालुक्यातील पिंपरी येथे आयोजित सभेत ते बोलत होते.



प्रत्येक गावात अभ्यासिका उभारली जाईल, ज्यामुळे विद्यार्थ्यांना बाहेर जाऊन अभ्यास करण्याची गरज भासणार नाही.आ. पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांसाठी योग्य ठिकाणी अभ्यासिका निर्माण करणे आवश्यक आहे. अनेक पालकांना आपल्या मुलींना अभ्यासासाठी बाहेर पाठवायचे नसते, परंतु त्यांच्याकडे योग्य सुविधा उपलब्ध नाहीत. त्यामुळे मी संकल्प केले आहे की प्रत्येक गावात अभ्यासिका तयार केली जाईल, जेणेकरून विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी कुठेही बाहेर जावे लागणार नाही.

या उपक्रमाद्वारे आ. पाटील यांचे उद्दिष्ट आहे की, विद्यार्थ्यांना त्यांच्या गावातच गुणवत्तापूर्ण अभ्यासाच्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी दूर प्रवास करावा लागणार नाही आणि पालकांचीही चिंता कमी होईल. आ. पाटील यांनी पश्चिम महाराष्ट्रातील गावांचे उदाहरण देत सांगितले की, पश्चिम महाराष्ट्रात प्रत्येक गावात आवश्यक त्या सुविधा आहेत. त्या सुविधांचे अनुकरण आपल्या गावांमध्ये करून आपणही गावाच्या विकासाला चालना देऊ शकतो. पाटील यांच्या मते, शिक्षणाच्या मूलभूत सुविधांची उभारणी केल्यास आपल्या मतदारसंघातील मुलांना अधिक चांगल्या संधी मिळतील, ज्यामुळे त्यांना उत्तम शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळेल असे त्यांनी सांगितले.

मराठवाडा साहित्य परिषदेच्या केंद्रीय

कार्यकारिणीवर डॉ. जयद्रथ जाधव यांचा विजय

लातूर:- मराठवाडा साहित्य परिषद छत्रपती संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी निवडणुकीत प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या संस्था संवर्धक पॅनलकडून डॉ. जयद्रथ जाधव बहुमताने निवडून आले आहेत.या पॅनलमध्ये प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या सह एकूण बावीस उमेदवार होते. हे सर्व बावीस उमेदवार बहुमताने विजयी झाले आहेत.

तीन हजार सत्तर सभासद असून यापैकी २५३० मतदारांनी मतदान केले.त्यातील २५०४ मते वैद्य ठरली २६ मते अवैद्य ठरली.मतमोजणी सहा फेऱ्यातून पूर्ण केली. पूर्ण मतमोजणी नंतर कौतिकराव ठाले पाटील यांच्या पॅनलच्या २२ उमेदवारांना २३०० पासून ते २३७६ मते मिळाली. डॉ जयद्रथ जाधव यांना २३१७ मतं मिळाली.

मराठी भाषा, साहित्य व संस्कृती जतन आणि संवर्धन करीत निजाम संस्थांना विरोधात स्वातंत्र्याचा लोकलढा मराठवाड्यातील जनतेने या परिषदेच्या माध्यमातून लढला होता.मराठी माणसांची भाषिक, सांस्कृतिक अस्मिता म्हणून ही परिषद स्वातंत्र्यानंतर काम करीत आहे.महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळा अंतर्गत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची एक क्रियाशील घटक संस्था म्हणून मराठवाडा साहित्य परिषद आहे.परिषदेच्या मराठवाड्यात सर्वत्र शाखा आहेत.प्रतिष्ठान द्वैमासिक, मराठवाडा साहित्य संमेलन, लेखिका साहित्य संमेलन, बालकुमार साहित्य संमेलन आणि घटक संस्थेच्या नियमाप्रमाणे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन या परिषदेकडून होते.या परिषदेची धुरा अत्यंत सक्षमपणे सांभाळणारे प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील यांच्या पॅननला सभासदांनी यावेळेस ही भरभरून प्रतिसाद देत २२ उमेदवारांना विजयी केले आहे.



डॉ जयद्रथ जाधव हे लातूर शाखेचे मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या पाच वर्षाच्या कार्यकाळात शाखेला पुनर्जीवित केले. सातत्याने कवी संमेलन, साहित्य चर्चा, पुस्तक प्रकाशन आणि चार शिवार साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन केले आहे. अशा साहित्य संवर्धक उपक्रमांतून लातूर जिल्ह्यातील साहित्यिकांना सतत व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे. अनेक नवोदित लेखकांना पुढे आणण्याचा प्रयत्न डॉ जयद्रथ जाधव यांचा सतत राहिला आहे. लातूर परिसरातील साहित्य चळवळ अधिक गतीमान करण्यात डॉ जाधव यांची निवड महत्त्वाची ठरणार आहे.

डॉ.जयद्रथ जाधव हे रेणापूर येथील शिवाजी महाविद्यालय मराठी विषयाचे प्राफेसर म्हणून कार्यरत आहेत.स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मराठी अभ्यास मंडळ व विद्यार्थी कल्याण सल्लागार सदस्य म्हणून पंधरा वर्षे कार्यरत होते. लोकसाहित्य,संत साहित्य,ग्रामीण, दलित आणि वैचारिक साहित्याचे ते विशेष अभ्यासक आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली एम.फिलच्या आठ व पीएच.डीच्या आठ विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केली आहे. 'जागतिकीकरण मराठी भाषा आव्हाने आणि उपाय', '१९८० नंतरचे मराठी साहित्य स्वरूप आणि समीक्षा', 'ग्रामीण साहित्य स्वरूप आणि संदर्भ', 'परिवर्तनवादी चळवळी' 'निवडक मराठी गद्य', 'विचार संवाद' आणि लातूर वसा आणि वारसा ही त्यांची ग्रंथसंपदा असून नवोदित लेखकांच्या अनेक पुस्तकांना प्रस्तावना लेखन केले आहे. लातूर वसा आणि वारसा या ग्रंथात लातूर जिल्ह्याचा दोन हजार वर्षाचा इतिहास ७४ लेखातून लिहिला आहे. राष्ट्रीय व राज्यस्तरीय चर्चासत्रात ते साधन व्यक्ती म्हणून निमंत्रित असतात. अनेक नियतकालिकातून तीस शोधिबंधाचे लेखन केले आहे. त्यांना महात्मा ज्योतिबा फुले विभागीय आदर्श शिक्षक पुरस्कार छत्रपती संभाजीनगर,गंगाधर मोरजे स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार अहमदनगर, हुतात्मा छत्रपती चौथे शिवाजी महाराज राज्यस्तरीय पुरस्कार, स्वामी विवेकानंद राष्ट्र गौरव पुरस्कार, जय क्रांती साहित्य प्रेरणा पुरस्कार मिळाला आहे. त्यांच्या विजयाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा.आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, सचिव सौ प्रतिभाताई पाटील, उपाध्यक्ष मा.अजितभैय्या पाटील कव्हेकर, समन्वयक संचालक श्री.निळकंठराव पवार, प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, उपप्राचार्य डॉ.आर.व्ही. घाडगे, डॉ.पी.आर.शिंदे, डॉ. गणेश नागरगोजे, डॉ.सतीश यादव, मुख्याध्यापक मारूती सूर्यवंशी, डॉ.सुरेश नांदे, डॉ. आर.सी.जाधव, डॉ.क्रांती मोरे, डॉ.एस.एस.पवार, डॉ.चंद्रकांत शेरखाने,डॉ.श्याम लेंडवे, डॉ. अर्जुन कसबे, डॉ.अंकुश भंडे यांच्या सह अनेक मित्रांनी अभिनंदन केले आहे.

तिसऱ्या राज्यस्तरीय काव्य संमेलनात ओमप्रकाश तांबोळकर व सतिस मल्लाडे यांच्या सह तीस मान्यवर सन्मानित

प्रशांत तांबोळकर

शिरूर अनंतपाळ : तालुक्यात प्रति वर्षीप्रमाणे यंदाही तीसरे श्री अनंतपाळ ग्रामीण राज्यस्तरीय काव्य संमेलन येथील कवी गोविंद श्रीमंगल यांनी आयोजित करून शेकडो साहित्यकांच्या उपस्थित मोठया उत्साहात पार पाडले.



कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ कवि डॉ. विजयकुमार कस्तुरे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून भरत महाराज हिंगोलीकर,शि.भ.प. शीलाताई चिवरकर, निलंगा आगार प्रमुख अनिल बिडवे, दहिवा सगर,पद्मिनी गुजरे,जयश्री पवार, पुजा माळी, सोनाली रायपुरे, बाळासाहेब मगर, ज्योती देशमुख आदी साहित्यिक व कवि उपस्थित होते. काव्य संमेलनाची सुरूवात सकाळी अकरा वाजता महात्म्यांच्या प्रतिमेचे विधीवत पुजन करून अध्यक्षांच्या हस्ते दिप प्रज्वलन करण्यात येऊन येणाऱ्या मान्यवरांचे आयोजक गोविंद श्रीमंगल यांच्याकडून शाल, श्रीफल, पुष्पहार घालून जाहीर सत्कार करण्यात आला.

त्यानंतर कार्यक्रमास सुरूवात करून अध्यक्षीय भाषणात जेष्ठ कवी डॉ.विजयकुमार कस्तुरे यांनी उपस्थित कवि, साहित्यिक, पत्रकार, नाटककार, यांच्यावर सविस्तर असे मार्गदर्शन केले.

तसेच यावेळी कवयत्री पुजा माळी लिखित कवितेच्या बागेत या बाल काव्य संग्रहाचे प्रकाशन सोहळा मान्यवरांकडून करण्यात आला.

तर दुस-या सत्रात मान्यवरांच्या हस्ते जेष्ठ पत्रकार सतिश मल्लाडे व ओमप्रकाश तांबोळकर यांच्यासह तीस कवि, साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशस्तीपत्र, मानचिन्ह, देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी कार्यक्रमात कर्नाटक, गोवा,आंध्रप्रदेश, महाराष्ट्र राज्यसह तालुक्यातील नामांकित कवि, साहित्यिक, विचारवंत, प्रा.चिचोंडे, पाटील, पत्रकार फत्तेअलीखान पठाण, संजीव कांबळे, बाबुराव बोरोळे, रब्बानी बागवान, प्रा.प्रभाकर चोंचडे आदींसह शेकडो श्रोते मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

कवि संमेलनाचे सुंदर असे सुत्रसंचालन उत्कृष्ट निवेदक आदमाने यांनी केले तर आभार प्रदर्शन नंदाबाई श्रीमंगल यांनी केले.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

यशवंत
मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४
४
धाराशिव जिल्हा
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

मराठा, मुस्लिम, धनगर आरक्षणासाठी आवाज उठविणार - आ. पाटील



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) - मराठा, मुस्लिम व धनगर समाजाच्या आरक्षण लढ्यात मी विधानसभेत व रस्त्यावर देखील आवाज उठवणार असल्याचे आश्वासन आमदार कैलास पाटील यांनी दिले. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महविकास आघाडीचे उमेदवार आ. कैलास पाटील यांनी कळंब तालुक्यातील विविध ठिकाणी सभा घेत आपल्या निवडणूक प्रचाराला जोर दिला आहे. या सभांमध्ये आ. पाटील यांनी मुस्लिम, धनगर आणि मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत ठाम व स्पष्ट भूमिका मांडल्यामुळे या समुदायांच्या प्रश्नांकडे ते संवेदनशील असल्याचे दिसून येत आहे. पुढे बोलताना आ. पाटील म्हणाले की, माझी भूमिका सुरुवातीपासूनच स्पष्ट आहे. मुस्लिम, धनगर व मराठा या तिन्ही समाजाला आरक्षणाचा लाभ मिळाला पाहिजे. तर मी या समुदायांसोबत एक सेवक म्हणून उभा आहे.विशेषण म्हणजे त्यांनी तिन्ही समाजाच्या हक्कांच्या संरक्षणासाठी संघर्ष करण्याची तयारी दर्शवली असून, या समाजांना संवैधानिक मार्गाने आरक्षण देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. आ. पाटील यांच्या मते, या तिन्ही समाजांच्या मागण्यांवर योग्य तोडगा काढण्यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत आणि निवडून आल्यानंतर ते हा विषय अधिक तीव्रतेने मांडतील, असे आश्वासन त्यांनी दिले. या सभेला महिला, पुरुष व तरुण मोठ्या संख्येने नागरिकांनी हजेरी लावली होती.

सरकार बदलल्याशिवाय शांत बसणार नाही

परंडा येथील जाहीर सभेत शरद पवार यांचा एल्गार





परंडा दि.११ (प्रतिनिधी) - आता एक म्हातारा खांद्यावर बसून आलेला पाहिला का ? हे सरकार बदलल्याशिवाय मी म्हातारा होणार नाही, शांत बसणार नाही, असा ठाम निर्धार राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी दि.१० नोव्हेंबर रोजी व्यक्त केला.

परंडा विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार राहुल मोटे यांच्या प्रचारासाठी परंडा येथील आठवडा बाजार मैदानावर आयोजित केलेल्या सभेत ते बोलत होते. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, उमेदवार राहुल मोटे, शिवसेना जिल्हाप्रमुख रणजित पाटील, मेघराज पाटील, काँग्रेसचे ड हनुमंत वाघमोडे, रमेश परदेशी, राहुल बनसोडे, सुजित देवकते, श्रीहरी नाईकवाडी, नसीर शहा बर्फीवाले, नंदू शिंदे आदीसह महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, परंडा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार राहुल मोटे मैदानात आहेत. तर त्यांच्या विरोधात शिवसेना शिंदे गटाचे तानाजी सावंत निवडणूक लढवत आहेत. या लढतीकडे पूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागलं आहे. संविधान बदलण्यासाठी ४०० पारची घोषणा केली. मात्र तुम्ही लोकांनी निर्णय हाती घेतला. तुम्ही आम्ही एकत्र झालो आणि महाराष्ट्रातील ४८ खासदारांपैकी ३१ खासदार तुम्ही निवडून दिले आणि घटना वाचवायचे काम तुम्ही केले असल्याचे पवार यांनी सांगितले. तर ही विधानसभा तुमच्या विचाराच्या लोकांच्या हातात पाहिजे. सत्ता हातात आल्यावर लोकांचे प्रश्न सोडवता येतात असेही त्यांनी सांगितले. तसेच दुष्काळाला तोंड देणारा, रोजगार हमीच्या कामावर जाणारा तुमच्यासारखा शेतकरी ऊस उत्पादन करतोय. माझा बळीराजा सुखी झाला पाहिजे, त्याच्या घरातील मुले उच्चशिक्षित झाली पाहिजेत. त्यासाठी आम्ही काम हातात घेतले आहे. महाविकास आघाडीचे संघटन उभे केल आहे. महिलांना अधिकार दिले की महिला काहीही करू शकतात. महिलांना संधी देण्यासाठी महालक्ष्मी योजना काढल्याचे पवार यांनी सांगितले. या सभेला परंडा - भूम - वाशी या मतदार संघातील महिला, पुरुष व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाराष्ट्र गद्दरीच्या राजकारणाने पोखरला गेला - खा. राजेनिंबाळकर

आपला महाराष्ट्र गद्दरीच्या राजकारणाने पोखरला गेला असल्याचे खा ओमप्रकाश राजे शनिंबाळकर यांनी सांगितले. तर खोक्याच्या आमिषाने, ईडीच्या भीतीने अनेकांनी पक्षाची साथ असल्याचे नमूद करून ते म्हणाले की प्रधानमंत्री मोदींच्या सभेत टेलीप्राँटर आम्ही पाहीले. पण कालच्या सभेत लाईव्ह टेलीप्राँटर पाहिले. मागून प्राँट करत होते, असे म्हणत राजेनिंबाळकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री तानाजी सावंत यांना टोला लगावला. तसेच महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात असणाऱ्या मंत्र्याचा सर्वात मोठ्या फरकाने पराभव होईल असा दावा खा. राजेनिंबाळकर यांनी केला.

उजनीचे पाणी राहुल मोटेच आणणार

महायुतीचे उमेदवार सावंत हे मुरूम टाकू शकतात, महिला बचत गटांना पैसे देवू शकतात. परंतू ग्रामीण भागातील रस्ते, शहरातील पाणी प्रश्न, रस्ते तसेच उजनीचे पाणी परंडा तालुक्यात फक्त राहुल मोटेच आणू शकतात असे राहुल मोटे यांनी सांगितले.

धाराशिव व कळंब तालुक्याचा विकास आराखडा माझ्याकडे तयार- पिंगळे



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) - धाराशिव - कळंब तालुक्यात मराठवाडा कृष्णा खोऱ्यातील हक्काचे पाणी आणण्यासाठी आमदार कैलास पाटील यांनी काहीच प्रयत्न केले नाहीत. तर सत्तेच्या काळात देखील धाराशिव व कळंब तालुक्यासाठी विशेष विकास निधी आणला नाही. शहरासह ग्रामीण भागातील रस्त्यांची वाट लागली असून धाराशिव शहर बगीचांचे शहर करण्यासह कळंब शहरात छत्रपती शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांचे सुशभीकरण करणे. तसेच धाराशिव व कळंब तालुक्याचा विकास आराखडा माझ्याकडे तयार असल्याची माहिती महायुतीचे धाराशिव - कळंब विधानसभा मतदार संघाचे उमेदवार अजित पिंगळे यांनी दि.१० नोव्हेंबर रोजी दिली.

धाराशिव येथील हॉटेल प्पलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी महायुतीचे तुळजापूरचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील, भाजपाचे दत्ताभाऊ कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रा.सुशील शेळके, सचिन तावडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना पिंगळे म्हणाले की, आमदार कैलास पाटील यांनी त्यांची सत्ता असतानाच्या काळात म्हणजे अडीच वर्षाच्या काळात मतदार संघातील रखडलेल्या प्रकल्प मार्गी लावण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे एकही बैठक लावली नसल्याचा आरोप त्यांनी केला. मी शिवसेना प्रमुख स्व बाळासाहेब ठाकरे व स्व गोपीनाथ मुंडे यांच्या विचाराने प्रभावित होऊन मला मतदानाचा अधिकार नसल्यापासून शिवसैनिक म्हणून काम करीत आहे. तर १९८९ साली शिवसेनेचे पहिले लोकसभेचे उमेदवार यशवंत पेठे यांचा प्रचार केला असल्याचे त्यांनी सांगितले. मला कुठल्याही पदाची लालसा नव्हती. मात्र २०१९ ला मी निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक असताना बाहेरून आलेल्यांना शिवसेनेने उमेदवारी दिल्यामुळे माझ्यावर अन्याय झाला. त्यामुळे मी अपक्ष निवडणूक लढविली. त्यानंतर मला राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाकडून पक्षाचे काम करण्यासाठी ऑफर आली होती. मात्र मी शिवसेनेच्या विचाराशी मिळती जुळती भारतीय जनता पार्टी असल्यामुळे मी प्रवेश केला. माझी उमेदवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी निश्चित केली असल्याचे त्यांनी सांगितले. धाराशिव व कळंब या तालुक्यात अनेक विकास कामे करण्यासारखी होती. मात्र आमदार कैलास पाटील यांनी मी विरोधी पक्षाचा आहे अशी बोंबाबोंब करण्यापलीकडे काही केला नाही. मात्र रोजगार निर्मिती प्रकल्प आणण्यासाठी तत्कालीन पालकमंत्री, खासदार व आमदार यांनी एकही बैठक घेतली नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच मेडिकल कॉलेजचा अर्धवट प्रस्ताव केंद्राकडे पाठवला. तर तुळजापूर तीर्थक्षेत्रासाठी रेल्वे आणण्यासाठी ठाकरे सरकारने ५० टक्के निधी देण्यासाठी बैठक घेतली नसून धाराशिव येथील विद्यापीठ उपकेंद्राचे पूर्ण विद्यापीठात रूपांतर करण्यासाठी प्रयत्न केले नसल्याचा आरोपही त्यांनी केला. मात्र महायुतीचे सरकार आल्यानंतर कृष्णा मराठवाडा प्रकल्पाला सुधारित मान्यता दिली. मेडिकल कॉलेज मंजूर केले. तर ठाकरे यांच्या काळात २०२१ व २०२२ मध्ये अतिवृष्टीचे अनुदान व पीक विमा घेण्यासाठी साधी बैठक देखील घेतली नसून शेतकऱ्यांच्या अन्नात माती कालवण्याचे काम केले असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र सत्ता बदलल्यानंतर पीक विमा रक्कम मिळणार असे दिसताच आ. कैलास पाटील यांनी आमरण उपोषणाचे नाटक केले असल्याचा घणाघात त्यांनी केला

धाराशिव व कळंब शहर आणि ग्रामीण भागातील रस्ते चांगले झाले पाहिजेत, शिराढोण येथे एमआयडीसी स्थापन झाली पाहिजे, कळंब येथे छत्रपती शिवाजी महाराज व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यांचे सुशभीकरण, कसबे तडवळा येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक, धाराशिव व कळंब येथे मुस्लिम समाजासाठी शादीखाना, येरमाळा येथील महाबीज बियाणे महामंडळाची जागेवर शैक्षणिक संकुल उभारण्यासाठी मी विकास आराखडा तयार केला असल्याचे पिंगळे यांनी सांगितले.

तुळजापूरचा कायापालट हेच ध्येय - आ. पाटील

रेकॉर्ड ब्रेक गर्दीने महायुतीचे तगडे शक्ती प्रदर्शन



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) - तुळजाभवानी देवीच्या तीर्थक्षेत्राचा कायापालट हेच आपले ध्येय आहे. जगदंबेच्या आशीर्वादाने मागील पाच वर्षांत तुळजापूर मतदारसंघाची सेवा करण्याचे भाग्य लाभले. तीर्थक्षेत्र तुळजापूर रेल्वेच्या राष्ट्रीय नकाशावर नोंदविता आले. जागतिक दर्जाचे धार्मिक पर्यटन तुळजापूर शहरात विकसित करण्यासाठी दोन हजार कोटी रूपयांचा विकास आराखडा अंतिम करण्यात आला आहे. रोजगार निर्मितीकडे आपले विशेष लक्ष आहे. तुळजापूरचा कायापालट होत आहे. जिल्ह्याचाही सर्वार्थाने कायापालट करण्यासाठी आपल्या सर्वांचे सहकार्य आणि सोबत महत्वपूर्ण असल्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले.

तुळजापूर शहरात महायुतीचे उमेदवार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या प्रचारार्थ रविवारी सायंकाळी भव्य आशीर्वाद यात्रा पार पडली. यावेळी ते बोलत होते. रविवारी सायंकाळी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सामूहिक अभिवादन करून आशीर्वाद यात्रेस प्रारंभ झाला. छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते भवानी रोड, महाद्वार रोड, कमान वेस गल्ली या प्रमुख मार्गावरून तुळजाभवानी मंदिरापर्यंत ही आशीर्वाद यात्रा काढण्यात आली. त्यानंतर आशिर्वाद यात्रेचे भव्य सभेत रूपांतर झाले. तुळजाभवानी मंदिरासह परिसरात विकासकामे करून, पर्यटक व भाविकांच्या संख्येत दुपटीने वाढ होण्यासाठी आवश्यक ती विकासकामे सुरू करण्यात आली आहेत. त्यामुळे स्थानिक व्यापार्यांना आणखी पर्यायी व्यवसाय करून आपले उत्पन्न दुपटीने वाढविता येणार आहे. तुळजापूरकरांना विश्वासात घेवूनच सर्व विकासकामे करायचे आहेत. ठाकरे सरकारने रेल्वे प्रकल्पासाठी एक रूपयाही दिला नाही, अडीच वर्षे काम थांबले होते. त्यासाठी आपण परिवहन मंत्र्यांवर हक्कभंग आणला. शेवटी साडेचारशे कोटी रूपयांचा निधी महायुती सरकारनेच उपलब्ध करून दिला आणि रेल्वेमार्गाचे काम चालू झाले. केंद्र सरकारच्या प्रशाद योजनेसाठी तीर्थक्षेत्र तुळजापूरचा विकास आराखडा तत्कालीन महाविकास आघाडी सरकारने पाठवावा, यासाठी आपण पाठपुरावा केला होता. मात्र ठाकरे सरकारने ऐकले नाही. शेतकर्यांना कर्जमाफी, वीजबिल माफी महायुती सरकारनेच दिली. मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले, लाडक्या बहिणींना महिन्याला दीड हजार रूपये लाभाची योजना सुरू केली. त्यामुळे विरोधकांना अडीच वर्षात महायुती सरकारने काय केले, हे विचारण्याचा नैतीक अधिकार राहिला नाही. नळदुर्गला बसवसृष्टी उभारली जात आहे, तुळजापुरात अहिल्यादेवी होळकरांचे स्मारक, बौध्द विहार, शादीखान्याचे भूमिपूजन केले. हा फक्त विकासाचा ट्रेलर आहे. विकासाचा पिक्चर अजून बाकी असल्यामुळे त्यासाठी सर्वांची साथ हवी असल्याचे आ पाटील यांनी सांगितले.

आरक्षण वाचविण्यासाठी वंचितच्या उमेदवारांना निवडून देऊन सभागृहात पाठवावे -ॲड. आंबेडकर



धाराशिव दि.११ (प्रतिनिधी) - मागील लोकसभा निवडणुकीमध्ये आरक्षण बदलणार असे म्हणणाऱ्या भारतीय जनता पार्टी व त्यांच्या मित्र पक्षांना मतदारांनी चाप दिला आहे. त्यामुळे संविधान वाचले आहे. तर सर्वोच्च न्यायालयाने मागणी नसताना आरक्षणाचे उपवर्गीकरण व क्रीमिलिअर बंधनकारक करण्याचा निर्णय दिला आहे. मात्र त्याला वंचित बहुजन आघाडीसह इतरांनी विरोध केल्यामुळे ते क्षणापर्यंत थांबलेले आहे. त्यामुळे या विधानसभेत निवडणुकीच्या माध्यमातून विधान सभेच्या सभागृहामध्ये वंचित बहुजन आघाडीचे सिलेंडर म्हणजेच वंचितचे आमदार जर दिसले नाहीत तर पुन्हा आरक्षण दिसणार नाही अशी भीती त्यांनी व्यक्त केली. त्यामुळे आरक्षण वाचविण्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांनाच निवडून देऊन विधानसभा सभागृहात पाठवावे असे आवाहन वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड बाळासाहेब आंबेडकर यांनी दि.१० नोव्हेंबर रोजी केले.

धाराशिव शहरातील सिद्धाई मंगल कार्यालयात वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष बी.डी शिंदे, शितल शिंदे, ॲड. के.टी. गायकवाड, विकास बनसोडे, डॉ. नितीन ढेपे, मिलिंद रोकडे, जीवन कदम, उमेदवार ड प्रणित डिकले (धाराशिव), डॉ स्नेहा सोनकाटे (तुळजापूर), राम गायकवाड (उमरगा) आदी उपस्थित होते. पुढे बोलताना ॲड. आंबेडकर म्हणाले की, आरक्षणामुळे एससी एसटी ओबीसी आदींसह वंचित घटकांना मान सन्मान मिळत आहे.

मागच्या लोकसभा निवडणुकीमध्ये संविधान वाचले असून आता आरक्षण धोक्यात आहे. संविधानाच्या कलम १५ नुसार महिला व मागास घटकांना समानतेचा अधिकार मिळाला आहे. तर कलम १६ नुसार एससी, एसटी व ओबीसी या घटकांना संवैधानिक आरक्षणाची तरतूद आहे. मात्र आरक्षण विरोधी असलेले भारतीय जनता पार्टी, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना हे पक्ष आरक्षण संपवायला निघालेले आहेत. १९८९ साली तत्कालीन प्रधानमंत्री स्व. व्ही.पी. सिंग यांनी मंडल आयोग लागू करून ओबीसींना आरक्षण लागू केले. त्यामुळे ओबीसींना शिक्षण व नोकरीचे आरक्षण मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच एससी व एसटी आरक्षणाचे उप वर्गीकरण करण्यासह क्रिमिलेअर लागू करण्याचा निर्णय मागणी नसताना दिला आहे. त्या निर्णयानुसार एससी व एसटी प्रवर्गातील एका कुटुंबाने आरक्षणाचा फायदा घेतला तर पुन्हा त्या कुटुंबाला आरक्षणाचा फायदा घेता येणार नाही असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला असून त्याची अंमलबजावणी करण्यासाठी भाजप व काँग्रेसची सरकारे उतावीळ झाली असल्याचे त्यांनी सांगितले. विशेष म्हणजे सध्या ओबीसींचे राजकीय आरक्षण न्यायालयीन प्रक्रियेमुळे धोक्यात आले असून उर्वरित शैक्षणिक व नोकरीतील आरक्षण देखील ही प्रस्थापित मंडळी घालविण्यासाठी प्रयत्नशील असल्याचा आरोप त्यांनी केला. प्रस्थापित मंडळी पुन्हा निवडून येण्यासाठी धनशक्तीचा वापर करीत आहेत. मात्र त्यांच्या कोणत्याही प्रलोभनाला कोणीही बळी न पडता आपल्या हक्कासाठी व आपल्या पुढील पिढीच्या सुरक्षित भवितव्यासाठी वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे, आवाहन ॲड. आंबेडकर यांनी केले. या सभेस महिला, पुरुष व तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

CHANGE IN NAME

I have change my name from **SAHANAJBI SATTAR SHAIKH To SHAHNAJBI SATTAR SHAIKH** Hence for this declaration and will be known by this name I will use SHAHNAJBI SATTAR SHAIKH in future the same name will be used by my Wife, Children and Family

OLD NAME : SAHANAJBI SATTAR SHAIKH

NEW NAME : SHAHNAJBI SATTAR SHAIKH

Address :- Musa Nagar, Udgir Dist.Latur Maharashtra 413517

CHANGE IN NAME

I have change my name from **SHAIKH SATTAR SHAIKH GAUSODDIN** To **SATTAR GAUSODDIN SHAIKH** Hence for this decleration and will be known by this name I will use in future the same name will be used by my wife, children and family.

OLD NAME : SHAIKH SATTAR SHAIKH GAUSODDIN

NEW NAME : SATTAR GAUSODDIN SHAIKH

Address :- Patel Saw Mill chya Bajula Udgir Latur Maharashtra 413517

जाहीर प्रगटन

जाहीर प्रगटन देणार : प्रशांत पि. व्यंकटराव जगताप
वय ४४ वर्षे धंदा व्यापार व शेती
रा. बिदर रोड, उदगीर
मो. नं. ९४२२९११५०७

कारणे जाहीर प्रगटन देतो की, मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून मौ. सावरगाव ता. देवणी येथील जमीन भु.क. ८८ मधील लिहून देणार यांच्या सामाईक मालकी व ताबा वहीवाटीचे जमीन एकुण क्षेत्र ०४ हे. ०५ आर पैकी आग्नेय दक्षिण बाजूकडुन असलेले जमीन क्षेत्र ४० आर ही जमीन श्री. रघुनाथ शिवाजी कोनाळे, शेवंताबाई शिवाजी कोनाळे उर्फ शेवंता शिवाजीराव कोनाळे, नेताजी शिवाजी कोनाळे यांच्याकडून प्रगटन देणार यांनी नमुद जमीन विकत घेण्याचा ठराव केला असून सदर वर नमुद ४० आर जमीनीची चतुर्सिमा खालीलप्रमाणे आहे.

पुर्वेस : तोगरी निलंगा रस्ता
पश्चिमेस : सर्वे नं. ८७ चे क्षेत्र
दक्षिणेस : रस्ता (आग्नेय कोपऱ्यापर्यंत)
उत्तरेसः लिहून देणार कोनाळे यांची जमीन

वर नमुद मिळकतीची बयाना रक्कम मिळाली असून उर्वरित रक्कम खरेदीखताच्या दिवशी देवून खरेदीखत करून देण्याचे ठरले आहे. सदर मिळकतीशी कोणाचे कोणतेही हितसंबंध असतील अथवा कोणाकडे सदर मिळकतीचे गहाणखत, तारणपत्र, ठरावपत्र अथवा इतर कोणत्याही प्रकारचा करार केलेला असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसात कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर खुलासा सादर करावा. मुदतीत केणाची उजर/तकार नाही आल्यास वर नमुद मिळकत निर्जोखीम आहे असे समजून माझे अशील नमुद मिळकतीचे खरेदीखत करून घेतील व त्यानंतर कोणाचीही उजर/तकार माझ्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. ०७.११.२०२४
जाहीर प्रगटन देणार
प्रशांत पि. व्यंकटराव जगताप
रा. बिदर रोड, उदगीर
ता.उदगीर जि.लातूर

तर्फे
ॲड. बी.एन. बोळे
उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.८६५/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी नामे Dattatrya S/o Vyankatrao Pande, हे दिनांक १७.०७.२०२४ रोजी Ravankola Tq.Udgir Dist.Latur हया येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Gangabai W/o Vyanktrao Pande, Age- 65 yrs, Occu. H.H..
2) Balika W/o Dattatrya Pande, Age-45 yrs, Occu.H.H.,
3) Pranali D/o Dattatray Pande, Age-21 yrs, Occu.H.H.,
4) Girish S/o Dattatray Pande. Age- 17 yrs, Occu. Education,
Minor U/g of his real mother Balika W/o Dattatray Pande All R/o Ravankola Tq Udgir Dist Latur,

यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Gangabai W/o Vyanktrao Pande	65	Mother
2)	Balika W/o Dattatrya Pande	45	Wife
3)	Pranali D/o Dattatray Pande	21	Daughter
4)	Girish S/o Dattatray Pande	17	Son

अर्जदार याने Dattatrya S/o Vyankatrao Pande या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम साठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dattatrya S/o Vyankatrao Pande याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०६/१२/२०२४

संतोष डी. शिंदे
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुतराळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.जे.सी. गुप्ता, सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९२१/२०२४ नि.क्र. ०६

ज्याअर्थी नामे Dineshkumar Balaji Munde, हे दिनांक १८.१०.२०२४ रोजी Dongarshelki Tq.Udgir Dist.Latur हया येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Smt. Menka W/o. Dineshkumar Munde, Age 38 yrs, Occu Service
2) Ku. Aditi D/o Dineshkumar Munde 14 yrs, Occu. Education
3) Shourya S/o. Dineshkumar Munde, Age 10 yrs, Occu. Education U/g of their real motherSmt. Menka W/o. Dineshkumar Munde
4) Ushabai W/o. Balaji Munde, Age 65 yrs, Occu. H.H.
All R/o Dongarshelki Tq.Udgir Dist.latur

यांनी खालील नमुद ४ व्यक्ती हे मयताचे उत्तराधिकारी असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Smt. Menka W/o. Dineshkumar Munde	38	Wife
2)	Ku. Aditi D/o Dineshkumar Munde	14	Daughter
3)	Shourya S/o. Dineshkumar Munde	10	Son
4)	Ushabai W/o. Balaji Munde	65	Mother

अर्जदार याने Dineshkumar Balaji Munde या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Dineshkumar Balaji Munde याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख २३/१२/२०२४

संतोष डी. शिंदे
कनिष्ठ लिपीक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुतराळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.के.ए.पोवार, २ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९१०/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे Pundlik S/o. Gangaram Somwanshi and Anusaya W/o. Pundlik Somwanshi हे R/o. Pimpri Tq.Udgir Dist.Latur दिनांक ०९/१०/२००९ and ०६/०९/२०२४ R/o. Pimpri Tq.Udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Dnynoba S/o. Pundlik Somwanshi, Age 52, Occu- Agri
R/o. Pimpri Tq.Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद १ व्यक्ती हे मयताचे वारसदार असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Dnynoba S/o. Pundlik Somwanshi	52	Son

अर्जदार यांना Pundlik S/o. Gangaram Somwanshi and Anusaya W/o. Pundlik Somwanshi या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Pundlik S/o. Gangaram Somwanshi and Anusaya W/o. Pundlik Somwanshi याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०७/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १७/१२/२०२४

के.डी. सुर्यवंशी
कनिष्ठ लिपीक
२ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९१५/२०२४ नि.क्र. ०७

ज्याअर्थी नामे 1) Sharad S/o. Nirmalkanth Shah, हे दिनांक ०६/०४/२०२३, रोजी At. Udgir Tq. Udgir Dist, Latur. येथे मयत झाले आहेत, 2) Anand Anant S/o. Sharad Shah, हे दिनांक ३०/०९/२०२३, रोजी At. Udgir Tq. Udgir Dist, Latur येथे मयत झाले आहेत 3) Asha w/o Sharad Shah, हे दिनांक १२/०५/२०१६, रोजी At. Udgir Tq Udgir Dist, Latur. येथे मयत झाले आहेत व अर्जदार

1) Nalin @ Nalind S/o. Nirmalkant Shah, Age 63 yrs, Occu. Business
R/o. Marwadi Galli, Udgir Dist.Latur

यांनी खालील नमुद १ हे मयताचे वारसदार असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Nalin @ Nalind S/o. Nirmalkant Shah	63	Son

अर्जदार यांना 1) Sharad S/o. Nirmalkanth Shah 2) Anand Anant S/o. Sharad Shah 3) Asha w/o Sharad Shah या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू 1) Sharad S/o. Nirmalkanth Shah 2) Anand Anant S/o. Sharad Shah 3) Asha w/o Sharad Shah याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १६/१२/२०२४

डी.ए.कांबळे
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ९०३/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Ramrao S/o Sakharam Pawar हे दिनांक १४.०७.२०१० रोजी At. Nalgir Tanda Tq.udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Gangabao w/o Rama pawar wife Age 62 Years Occu. H.H
2) Jayshree w/o Sanjay Rathod-Daughter Age: 42 Occ HH-
3) Savitra w/o Kishan Rathod Daughter Age 38 Year Occ House Hold
All R/o Nalgir Tanda Tq. Udgir Dist, Latur

यांनी खालील नमुद ६ हे मयताचे वारसदार असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Gangabao w/o Rama pawar	62	Wife
2)	Jayshree w/o Sanjay Rathod	42	Daughter
3)	Savitra w/o Kishan Rathod	38	Daughter

अर्जदार यांना Ramrao S/o Sakharam Pawar या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय काम साठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Ramrao S/o Sakharam Pawar याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख ०९/१२/२०२४

डी.ए.कांबळे
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

वारसा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा जाहिरनामा

मा.एन.जे चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७६३/२०२४ नि.क्र. ०७

ज्यापेक्षा नामे Nisar Ahmad Ismall Lature हे दिनांक ११.०८.२०२४ रोजी At. Udgir Tq.udgir Dist.Latur येथे मयत झाले आहेत. व अर्जदार

1) Taherabi w/o Nisar Ahemad Shaikh (Lature) Age 61 शड. Occu H.H.
2) Nasima begum Gausoddin Shaikh (Lature) Age 46 yrs, Occu: HH.
3) Naimoddin S/o Nisar Ahemad Shaikh (Lature) Age: 44 yrs, Occu: Labour
4) Fahimuddin S/o Nisar Ahemad Shaikh (Lature) Age: 42 yrs, Occu: Labour
5) Abdul Rahim S/o Nisar Ahemad Lature Age: 40 yrs, Occu: Labour
6) Ajim S/o Nisar Shaikh (Lature) Age 36 yrs, Occu Labour
7) Shabana Begum D/o Nisar Shaikh (Lature) Age: 34 yrs, Occu: HH.
8) Waziruddin S/o Nisar Shaikh (Lature) Age 28 yrs Occu Labour
9 Wajid S/o Nisar Ahemad Shaikh (Lature) Age 26 yrs, Occu Labour
Above all R/o Dhangar Bawdi. Udgir Tq. Udgir Dist Latur

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून,

Sr.No.	Name of legal Heirs	Age	Relation of deceased
1)	Taherabi w/o Nisar Ahemad Shaikh (Lature)	61	Wife
2)	Nasima begum Gausoddin Shaikh (Lature)	46	Daughter
3)	Naimoddin S/o Nisar Ahemad Shaikh (Lature)	44	Son
4)	Fahimuddin S/o Nisar Ahemad Shaikh (Lature)	42	Son
5)	Abdul Rahim S/o Nisar Ahemad Lature	40	Son
6)	Ajim S/o Nisar Shaikh (Lature)	36	Son
7)	Shabana Begum D/o Nisar Shaikh (Lature)	34	Daughter
8)	Waziruddin S/o Nisar Shaikh (Lature)	28	Son
9	Wajid S/o Nisar Ahemad Shaikh (Lature)	26	Son

अर्जदार यांना Nisar Ahmad Ismall Lature या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू Nisar Ahmad Ismall Lature याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/११/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १५/११/२०२४

डी.ए.कांबळे
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुत्राळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

उदगीर मनोरंजन

कल्पना 70MM A/C DOLBY

११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

वेळ सकाळी ०९ ते ५	सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध	रविवार ९ ते १	@24 hrs X 365
१,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया	४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया		

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

मेडीकल व सर्जिकल रेटीना	डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI	३ रा रविवार
मेडीकल व सर्जिकल रेटीना	डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI	२ रा शनिवार
कॉर्नीया सर्जन	डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea)	२ रा शनिवार
नासुर तज्ञ	डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद)	२ रा रविवार ४ था रविवार
काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा	डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक	४ था रविवार

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेहेवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव

शिवसेना लातूर जिल्हा संपर्क प्रमुख ॲड.बळवंतभाऊ जाधव यांच्या वाढदिवसानिमित्य शासकिय रुग्णालयात फळ व अन्नदान वाटप



लातूरः- शिवसेना शहरच्या वतीने शिवसेना शिवसेना शहर प्रमुख ड. परवेज पठाण व शहर उपप्रमुख विजयकुमार कांबळे तसेच मा.जिल्हाप्रमुख बालाप्रसाद सोमाणी यांच्या वतीने विलासराव देशमुख शासकिय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय लातूर येथे सोमवार दि.११ नोव्हेंबर रोजी दु.१२:०० वा फळ व अन्नदान वाटप शिवसेना जिल्हा संपर्क प्रमुख ड. बळवंत जाधव यांच्या वाढदिवसा निमित्य वाटप करण्यात आले.

यावेळी महिला जिल्हा प्रमुख कल्पनाताई बावगे, शिवसेना उपजिल्हा प्रमुख ग्रामीण विजय जाधव, महिला जिल्हा उपप्रमुख अनिता नागिमे, बचत गट प्रमुख वर्षा धडे, शहर प्रमुख ड.परवेज पठाण, उपशहर प्रमुख विजयकुमार कांबळे, शहर संघटक बालाजी सुर्यवंशी , ॲड.अर्जुनभाऊ जाधव , वारकरी सेना जिल्हा प्रमुख गणपती वलसे महाराज खंडापुरकर , तालुका प्रमुख सदाशिव गव्हाणे , उपशहर प्रमुख राजु बागवान, कामगार सेना तालुका प्रमुख शमशोद्दीन शेख, उप तालुका प्रमुख शाम साबळे,रेणापुर शहर प्रमुख रवी चव्हाण, युवा सेना उपजिल्हा प्रमुख कृष्णा सरवदे, अल्पसंख्यांक शहर प्रमुख नबी सय्यद , युवासेना जिल्हा सचिव गणेश पवार , युवासेना शहर प्रमुख फरीद शेख, युवासेना शहर पृथ्वीराज शिंदे , आकाश जाधव, रेणापुर युवा सेना तालुका प्रमुख शामराजे , प्रथमेश नरवणे, वंदना गोरे, लक्ष्मीबाई चव्हाण, सुरेखा बिडवे, पुष्पा तोडकर, प्रेमा वलसे, लोखंडे, समर्पन फाउंडेशनचे पदाधिकारी, शिवसैनिक मोठया संख्येने उपस्थित होते.

राजकिय पुढार्यांचे वाढदिवस हे बॅनर बाजी, नको तिथे खर्च करुन साजरे केले जाते मात्र लातूर शहर शिवसैनिकांनी रुग्णांना त्यांच्या नातेवाईकांना अन्नदान करण्याचे ठरविले अन् पारही पडले अशा माणूसकीच्या नात्याने शिवसैनिकांनी अन्नदान सेवा केल्याने लोकांतून आनंद व्यक्त होत आहे.

मतदानाची टक्केवारी वाढवावी :खा. डॉ. अजित गोपछडे



देगलूर (प्रतिनीधी):-सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी केवळ सहा सात दिवस शिल्लक आहेत त्यामुळे शक्ती केंद्रप्रमुख,बूथ प्रमुख , व सर्व पदाधिकाऱ्यांना आपापल्या गावात राहून जास्तीत जास्त मतदान करून घेऊन मतदानाची टक्केवारी वाढवावी असे आवाहन राज्यसभा खा. डॉ. अजित गोपछडे यांनी अशोका पॅलेस येथे आयोजित केलेल्या संवाद बैठकीत केले. यावेळी प्रवीण साले,माधव पाटील उच्चेकर,लक्ष्मणराव ठक्करवाड , माधवराव मिसाळे गुरुजी,गंगाधरराव जोशी,शिवाजीराव देशमुख बळेगावकर, शिवाजीराव कणकंटे, हावगीराव गोपछडे, उमाकांतराव गोपछडे, जनार्दन बिरादार,चंदू पाटील सावळीकर,अनिल पाटील खानापूरकर,प्रशांत दासरवार, शिवकुमार देवाडे,यादवराव देसाई,पंकज देशमुख,रवी पाटील नरंगलकर,रुपेश पाटील भोकसखेडकर,गंगाधर दाऊलवार,प्रशांत पाटील,संजय पांचाळ,दीपक संगमकर,बसवंत गोपछडे,अनिल कमटलवार,बालाजी पा.थोटवाडीकर,राजू पाटील आदी उपस्थित होते.

पान १ वरून

मविआच्या...आज काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि मविआतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थितीत महाविकास आघाडीचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. या वेळी काँग्रेसचे सरचिटणीस के. सी. वेणुगोपाल, काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथला, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, राजस्थानचे माजी मुख्यमंत्री अशोक गेहलोत, राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रिया सुळे, शिवसेनेचे खासदार संजय राऊत आदी नेते उपस्थित होते.

महाविकास आघाडीचे सरकार सत्तेत आल्यानंतर महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इंदू मिलमधील स्मारकाचे काम पूर्ण केले जाईल, अशी ग्वाही देताना जाहीरनाम्यात अनेक आश्वासने देण्यात आली.

नोक-यांमधील कंत्राटी पद्धत बंद करणार

यासोबतच सरकारी नोक-यांतील कंत्राटी भरती पद्धत बंद करणार, सरकारी विभागातील जागांचा अनुषेश भरून काढणार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे वेळापत्रक ठरवून निवडणुका घेतल्या जातील. महाराष्ट्राच्या विकासासाठी कृषी, ग्राम विकास, उद्योग, रोजगार, शहरी विकास, जनकल्याण यावर आधारित आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी महाराष्ट्रनामा प्रकाशित करीत आहोत, असे सांगण्यात आले.

इंदू मिलमधील स्मारकाचे काम पूर्ण करण्याची ग्वाही

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे इंदू मिलमधील स्मारकाचे काम पूर्ण करू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉरिडॉर बनविला जाईल. शिव, शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांचे सरकार स्थापन करू तसेच २०३० पर्यंत समृद्ध महाराष्ट्र बनवण्याचा संकल्प या जाहीरनाम्यातून केला आहे.

महाराष्ट्राची निवडणूक देशाचे भविष्य बदलणारी

काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यावेळी म्हणाले की, महाराष्ट्रात सर्व जाती-धर्माचे लोक मुंबईकडे आर्थिकदृष्ट्या, रोजगारासाठी, उत्पादन, गुंतवणुकीच्या दृष्टीने अपेक्षेने पहातात. देशभरातून लोक मुंबईत स्वप्न घेऊन येतात व मुंबई त्यांना सामावून घेते, त्यांच्या स्वप्नांचा बळ देते. महाराष्ट्राची निवडणूक फक्त महाराष्ट्रासाठी नाही तर देशाचे भविष्य बदलणारी निवडणूक आहे. महाराष्ट्राच्या जनतेसाठी शेतकरी, तरुण, महिलांसाठी हे सरकार घालवणे गरजेचे आहे.

भाजपाचे...

निव्वळ फसवणूक केली आहे याची ही आठवण त्यांनी करून दिली.

महाविनाश आघाडीचा पराभव निश्चित असून महायुतीचे भवितव्य उज्ज्वल आहे असेही त्यांनी नमूद केले. उद्धव ठाकरेंना लक्ष्य करत श्री. गोयल यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लालसेपायी त्यांनी बाळासाहेब ठाकरेंच्या हिंदुत्वाच्या विचारांना मूठमाती दिली अशी बोचरी टीका केली. उद्धव ठाकरे यांनी राहुल गांधी यांच्याकडून स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल दोन वाक्ये वदवून घ्यावीत. ते त्यांना अजिबात जमणार नाही. त्यामुळे महाभकास आघाडीत त्यांचे काहीच चालत नाही, हेही स्पष्ट झाल्याचे गोयल यांनी सांगितले. देशातील १४० कोटी जनतेच्या एकत्रित विकासाची चिंता केली तरच हा देश सुरक्षित राहील,अशी नरेंद्र मोदी यांची धारणा आहे. धर्म,जात,भाषा आणि प्रांतानुसार होणारी वाटणी आम्हाला मान्य नाही. आम्ही सर्वांनाच एकत्र घेऊन वाटचाल करत असल्याने आम्हाला सर्वांचीच साथ असल्याचे गोयल यांनी नमूद केले.

भविष्यातील...

हाच धागा पकडत डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मनोगत व्यक्त करताना उपस्थितांच्या मनातील सर्व शंकांचे निरसन करत भविष्यातील नियोजनाबाबत त्यांना आश्वस्त केले.डॉ.

अर्चनाताई म्हणाल्या की, लातुरमधील व्यापारी व व्यावसायिक अजूनही उघडपणे बोलत नाहीत.आपण मला बोलावून हा कार्यक्रम आयोजित केला,आपल्या भावना मांडल्या त्याबद्दल आपले कौतुकच करायला हवे.डॉ.अर्चनाताई म्हणाल्या की,कुठलाही प्रश्न सोडविण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती असणे गरजेचे असते.आतापर्यंत आपण जाहीरनामे पाहूनच मतदान केले. माझ्याकडून मात्र अपेक्षा व्यक्त करत आहात.पण आव्हाने स्वीकारणे हा माझा स्वभावच आहे.कमी बोलून अधिक काम करणे ही माझी सवय आहे. त्यामुळे कुठलाही शॉर्टकट न वापरता मी लातूरसाठी काम करत राहणार असल्याचे डॉ. अर्चनाताई पाटील म्हणाल्या.

आपणा सर्वांचा उद्देश एकच आहे. लातूरचे भविष्य आपल्या डोळ्यासमोर आहे. पारदर्शक कारभाराच्या माध्यमातून आपण लातूरला उद्योग नगरी बनवू. आयटी हब बनवण्यासाठी काम करू.लातूर शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी काम करू.त्यासाठी आपल्या सर्वांच्या मदतीची गरज आहे.सर्वांनी मिळून काम केले तर हा काळ फार दिवस राहणार नाही,असेही डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यावेळी म्हणाल्या.

डॉ.अर्चनाताई पाटील यांच्या मुद्देसूद संभाषणास उपस्थितांनी टाळ्यांचा गजर करत अनुमोदन दिले.आम्ही सर्वजण आपल्या पाठीशी असल्याचे आश्वासन दिले.भविष्यातील लातूरसाठी समस्त लातूरकर एक होतील, असा विश्वास यावेळी उपस्थित व्यापारी व व्यावसायिकांनी डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना दिला.

काँग्रेसच्या...

घेतला.सर्वधर्म समभाव जोपासणारा भारत तयार करण्यासाठी ते काम करत आहेत.एक ओबीसी व्यक्ती तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान झाले असल्याचेही आठवले म्हणाले.

त्यांनी सांगितले की,भाजपाने लातूरमधून उच्चशिक्षित,डॉक्टर उमेदवार दिला आहे.जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी अर्चनाताई पाटील चाकूरकर सक्षम आहेत. गोरगरीब व बेरोजगारांच्या समस्या त्या सोडवतील.शहरातील पाणी व कचऱ्यासंदर्भात विधानसभेत आवाज उठवण्याचे काम त्यांच्याकडून केले जाईल,असेही आठवले म्हणाले.

बौद्ध धर्मात कमळाला अत्यंत महत्त्व आहे.हेच कमळ भाजपाचे निवडणूक चिन्ह आहे.त्यामुळे छत्रपती शिवराय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराजांना स्मरत डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांना निवडून आणा, असे आवाहनही आठवले यांनी केले.

माजी खासदार डॉ.सुनिल गायकवाड यांनी सांगितले की, काँग्रेस पक्ष जातीयवादी आहे. त्याच पक्षाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना पराभूत करण्याचे पाप केले होते.त्यामुळे आपण काँग्रेसला मतदान न करता भाजपा उमेदवाराला विजयी करावे,असे आवाहनही त्यांनी केले.

ड.बळवंत जाधव म्हणाले की,ही निवडणूक महायुती व महाविकास आघाडीची नाही तर महायुती विरुद्ध देशमुख अँड देशमुख कंपनीचा उमेदवार यांच्यात लढत होत आहे.

काँग्रेसने लोकसभेला दलिता ऐवजी लिंगायताला उमेदवारी दिली.या माध्यमातून स्वतःच्या हितासाठी लिंगायत समाजाचा गळा दाबण्याचे काम केले. काँग्रेसकडे दलित मताला किंमत नाही.ही मते विकत घेऊ असे त्यांना वाटते.आपल्या मताची विक्री करू नका,असे आवाहनही जाधव यांनी केले.

ड.व्यंकट बेंद्रे बेंद्रे यांनी काँग्रेस पक्ष लोकभावनेपासून दूर गेला असल्याचे सांगत नेतृत्वाचा अहंकारही वाढला असल्याचे म्हटले.देश अहंकाराने घडत नाही त्यासाठी दृष्टी असावी लागते. काँग्रेसचा अहंकार उतरवण्याची संधी आपल्याला चालून आली आहे.ही संधी दवडू नका,असेही ते म्हणाले.

महायुतीच्या उमेदवार डॉ.

अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की,आज सर्वत्र गाजत असलेली लाडकी बहिणी योजना ही अत्यंत कमी कालावधीत राबविण्यात आली.आजच पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित झाला असून त्यात लाडक्या बहिणीसाठी यापुढे २१०० रुपये देण्याची घोषणा करण्यात आली आहे.या लाडक्या बहिणींमुळे महायुतीचा विजय होणार आहे. शहरातील ८६ हजार महिलांना योजनेचा लाभ मिळाला असून त्या महायुतीलाच मत देणार असल्याचे ताईंनी सांगितले. जिल्हा रुग्णालयाला जागा देण्याचा निर्णय देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यासाठी निधीही मंजूर केला.परंतु आपल्या आमदारांनी त्यासाठी पाठपुरावा केला नाही.हा निधी आजही पडून आहे.कामासाठी पाठपुरावा करणारा आमदार नसणे ही लातूरची शोकांतिका आहे. लोकप्रतिनिधीचे वर्तन पोषक नसते तेव्हा परिवर्तन करावे लागते,असेही ताई म्हणाल्या. आपणास राजा बनण्यासाठी मतदानाचा अधिकार दिला आहे, दलाल बनण्यासाठी नाही असे सांगून लातूरला दहशतमुक्त, भयमुक्त करण्यासाठी महायुतीला विजयी करा.तुमच्या सोबत राहणाऱ्याला विजयी करा,असे आवाहनही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी केले.

देविदास काळे,जितेंद्र बनसोडे,प्रविण सुडे,संदेश सोनकांबळे यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.ड.विजय अवचारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या सभेस चंद्रकांत बिराजदार,ड.दीपकमठपती,प्रविण सावंत,ड.दिग्विजय काथवटे, प्रमोद गुडे,गणेश गवारे,शिवसिंह शिसोदिया,विवेक बाजपाई,मंगेश बिराजदार,अनिल गायकवाड, महेश कौळखेरे यांच्यासह भाजपा महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

पहिला वार माझ्यावर होईल : डॉ.अर्चनाताई पाटील

या सभेत बोलताना डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की,मी तुमच्यातलीच आहे.उदगीर हे माझे माहेर आहे. एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबात माझा जन्म झाला.

सरकारी महाविद्यालयात मी शिक्षण घेतले.अनेक अडचणींचा सामना केला.इतरांच्याही अडचणी पाहत मोठी झाले.या अडचणी सोडवण्याची संधी मला हवी आहे.तुमच्यावर कुठलीही अडचण आली तर मी तुमच्यासोबत नाही तर तुमच्या पुढे असेन.तुमच्यावर आघात झाला तर तो वार मी झेलेन. लोकशाहीचा प्रतिनिधी निवडून देण्यासाठी मला विधानसभेत पाठवा,असे आवाहनही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी या सभेत बोलताना केले.

महायुतीचे...

महाविकास आघाडी सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन जाणारी आहे. स्थानिक भाजप नेत्यांनी भाजप नेत्यांनी दलित खासदाराला सन्मानाने वागणूक दिली नाही. मग सामान्य जनतेच्या समस्या ते कशा प्रकारे सोडवतील?, असा संतप्त सवाल देखील आमदार देशमुखांनी विचारला.

फेल बेणं शेतकरी लावत नाही देशमुख

विरोधी उमेदवार वशिल्याने ऍडमिशन घेऊन आमदार झालेआहेत. आमदार होऊन तीन वर्ष झाले. तीन वर्षांत अधिवेशनामध्ये शेतकरी, बेरोजगारी, महिला यांच्या समस्या आपण सभागृत का मांडल्या नाहीत, असा सवाल धिरज देशमुखांनी उपस्थित केला. निवडणुका लढवत असताना आपले व्हिजन असले पाहिजे. शेतकरी दोनदा फेल गेलेले बेणे तिसऱ्यांदा कधीच आपल्या शेतात लावत नाही असा टोला ही याप्रसंगी देशमुखांनी विरोधकांना मारला.

याप्रसंगी महाविकास आघाडीतील नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आता चुक...

केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चंद्रकांत ढवण यांनी केले.

यावेळी आमदार अभिमन्यू पवारांनी विरोधी उमेदवाराला अव्हान दिले की . दहा वर्षात तुम्ही काय केले हे सांगा. पाच वर्षात मी काय केले हे सांगतो. विकासावर बोला मी कधीही आपल्या सोबत चर्चा करायला तयार आहे. विरोधी उमेदवाराकडे मुद्दे नसल्याने ते माझ्यावर शिवराळ भाषेचा वापर करीत आपली निष्क्रीयता झाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. मात्र तुम्ही जरी शिवराळ भाषा वापरत असाल तरी माझ्यावर चांगले संस्कार झाल्याने मी तुम्हाला थोरला भाऊच म्हणणार आहे असा टोला त्यांनी लगावला. यावेळी उजनी आणि पंचक्रोशीतील आनेक मतदार उपस्थित होते.

आ. रमेशआप्पा...

आज पर्यंत कोणीच दिले नाही असे सांगून यावेळी बोलताना माझी मंत्री रामराव वडकुते म्हणाले की, कारखाने काढणारे तर खूप आहेत. शिका आणि संघटित व्हा बाबासाहेबांच्या या संदेशानुसार कराड परिवाराने दूरदृष्टी ठेवून ठीक ठिकाणी शैक्षणिक संकुले उभे केली राजकारणाबरोबरच सामाजिक कार्यात योगदान देणाऱ्या विकासाचा नेता आ. रमेशआप्पा कराड यांच्या पाठीशी समाज बांधवांनी खंबीरपणे उभे राहावे. आमदारकीच्या माध्यमातून मतदार संघात केलेल्या विविध विकास कामाची माहिती देऊन यावेळी बोलताना महायुतीचे उमेदवार आ रमेशआप्पा कराड यांनी संपूर्ण मतदारसंघात परिवर्तनाचे वारे आहे आपल्यासाठी आपल्या न्याय हक्कासाठी आणि विकासासाठी ही लढाई अत्यंत महत्त्वाची असून मस्तवाल काँग्रेसवाले पैशाच्या जोरावर निवडणुक जिंकण्याचे प्रयत्न करीत असले तरी यावेळी मतदार धडा शिकवल्याशिवाय राहणार नाहीत तेव्हा आपण सर्वांनी या परिवर्तनाच्या लढाईत महायुतीला विजयी करून योगदान द्यावे असे आवाहन केले.यावेळी धनगर समाज संघर्ष समितीचे प्रदेशाध्यक्ष आनंद बनसोडे, भाजपा नेते राजेश कराड, धनगर समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणारे अनिल गोयकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल पुजारी यांनी केले तर शेवटी विष्णू पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले या प्रसंगी धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रपत्र सी-1

(उमेदवाराने वृत्तपत्रे, दुरदर्शन यामध्ये प्रसिध्द करण्यासाठी)

फौजदारी प्रकरणांबाबतचे घोषणापत्र

माननीय सर्वोच्च न्यायालयाने **2011** ची रिट विनंती यांचिका (दिवाणी) **क्र. 536 (पब्लिक इंटरेस्ट फाउंडेशन आणि इतर विरुध्द युनियन ऑफ इंडिया व इतर) या प्रकरणी दिनांक 25 सप्टेंबर 2018** रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार

उमेदवाराचे नाव व पत्ता : **सौ. अर्चना शैलेश पाटील, रा. न्यु आदर्श कॉलनी, लातूर – 413 512 (महाराष्ट्र)**

राजकीय पक्षाचे नांव : **भारतीय जनता पार्टी**

(अपक्ष उमेदवारांनी येथे 'अपक्ष' असे लिहावे)

निवडणुकीचे नांव : **विधानसभा सार्वत्रिक निवडणूक – 2024**

मतदारसंघाचे नांव : **235 - लातूर शहर विधानसभा मतदारसंघ**

मी, **सौ. अर्चना शैलेश पाटील** (उमेदवाराचे नाव) वर नमुद केलेल्या निवडणुकीचा उमेदवार असून, माझ्या फौजदारी पूर्व चरित्रबद्दलचा पुढील तपशील जनतेच्या माहितीसाठी घोषित करीत आहे.

(अ) प्रलंबित फौजदारी प्रकरणे

अ. क्र.	न्यायालयाचे नांव	प्रकरण क्रमांक व दिनांक	प्रकरणची सद्यस्थिती संबंधित अधिनियमांचे कलम (अधिनियमांची कलमे) आणि अपराधाचे (अपराधांचे) थोडक्यात वर्णन
1.	मा.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय एसप्लेनेड, मुंबई	2749/एसएस/2017, दाखल दि. 06.10.2017	मा. न्यायालया समोर प्रलंबित, कलम 138 निगोशियेबल इनस्ट्रुमेंट कायदा 1881, धनादेश अनादर झालेबाबत. ही तक्रार उमेदवाराविरुध्द फक्त कंपनीच्या संचालक पदावर दाखल आहे म्हणजे रुद्राणी हेल्थकेअर सर्व्हिसेस लि.
2.	निरंक	प्रथम माहिती अहवाल क्र.0574/2024/ग्रामीण पोलिस स्टेशन, उदगीर येथे दाखल दि.19.10.2024	प्रलंबित, कलम 409,416,420,467,471 आणि 34 भारतीय न्याय संहिता 1860. अतिरिक्त सत्र न्यायालय, उदगीर यांनी फौजदारी पुनःनिरीक्षण याचिका क्र.24/2024 मध्ये दि.18.10.2024 रोजी स्थगिती आदेश दिल्यानंतर, रुद्राणी हेल्थकेअर सर्व्हिसेस लि.च्या संचालक पदाच्या क्षमतेअंतर्गत गुन्हा नोंद झाला आहे.

(ब) फौजदारी अपराधांसाठी दोषसिध्द ठरविलेल्या प्रकरणांचा तपशिल

अ. क्र.	न्यायालयाचे नांव व आदेशाचा (आदेशांचे) दिनांक	अपराधांचे (अपराधांचे) वर्णन व ठोठावलेली शिक्षा	जास्तीत जास्त ठोठावलेली शिक्षा
निरंक	लागु नाही	लागु नाही	लागु नाही

उमेदवाराचे नाव व सही
सौ. अर्चना शैलेश पाटील

ठिकाण : लातूर
दिनांक : 11.11.2024

जाहिर प्रगटन

माझे पक्षकार श्री.अमोल महादेव काळे रा. लातूर यांनी दिलेल्या माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन जाहीर प्रगटन करण्यात येते की, माझे पक्षकार हे दिनांक १८/१०/२०२४ रोजी सायंकाळी शिवाजी चौक ते बारा नंबर पाटी या दरम्यान ॲटोरिक्षाने प्रवास करत असताना माझे पक्षकाराची कागदपत्रे असलेली कॅरीबॅग गहाळ झाली. सदर कॅरीबॅगमध्ये मुळ साठेखत दस्त क्र. १७०९/२००७ दि. १८/०५/२००७ ची मुळ प्रत होती. सदरचे मुळ साठेखत हे सदनिका क्र. G-६ याच्या लिकींग खरेदीखत आहे. त्याबाबत माझे पक्षकाराने एम. आय. डी. सी. पोलीस स्टेशन लातूर येथे अर्ज दिलेला आहे व त्यावरुन एफ.आय.आर. क्र. ७०४/२०२४ ची दि. २/१०/२०२४ रोजी नोंद झाली आहे. सदरील मुळ साठेखतासंबंधी किंवा जो कोणी व्यक्ती सदरील कागदपत्राआधारे कसल्याही प्रकारचा व्यवहार करत असेल तर माझे पक्षकार यांचे होणारे नुकसान अथवा परिणामास सदरील बेकायदेशीर कामाबाबत जबाबदार राहणार नाहीत. जो कोणी अशा प्रकारचा व्यवहार करील त्याची सर्वस्वी दिवाणी व फौजदारी प्रकारची जबाबदारी त्याच्यावर राहील. तरी कोणास वरील नमुद कागदपत्रांबाबत माहिती असेल तर खालील नमुद पत्त्यावर कळवावे अथवा कोणाकडे वरील नमुद मुळ खरेदीखत आरआर पावतीसह असल्यास खालील नमुद पत्त्यावर जमा करावे. तसेच सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द् झालेपासून सात (७) दिवसाच्या आत सदरील कागदपत्रांबाबत माहिती नाही मिळाली तर माझे पक्षकार सदरील कागदपत्रांची नक्कल संबंधीत कार्यालयातून काढुन घेतील व योग्य ती पुढील कार्यवाही करतील, याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन . दिनांक : ११/११/२०२४

तर्फे :
ॲड. एस. एस. ढगे
ढगे कॉम्प्लेक्स,
न्यु क्लॉथ लाईन, लातूर.
मो.क्र. ९४२२६५८१३३.

जाहीर प्रगटन देणार
अमोल महादेव काळे

लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.उदगीर नगरपरिषद, उदगीर जि.लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

कालावधी	व्याजदर
३० ते ४५ दिवस -	५.५० %
४६ ते १८० दिवस	७.५० %
१८१ ते ३६५ दिवस	८.५० %
१२ महिने ते २४ महिने	९.७५ %
२४ महिने ते ३६ महिने	१०.५० %
३६ महिने ते ६० महिने	१० %

९ % आवर्त ठेव द.सा.द.शे. ०.५० % अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट,७८ महिने, वैधानिक कर्ज व इतर कर्ज १६ % सोने तारण कर्ज १४ % केअर हाउस कर्ज १६ %, वरिल सर्व ठेवीवर निमय व अटी लागू.



यशवंत

मंगळवार दि. १२ नोव्हेंबर २०२४

पान ८

उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३९९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com

बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

कालावधी	व्याजदर	जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर
३१ दिवस ते ४५ दिवस	५.००%	५.५०%
४६ दिवस ते १८० दिवस	७.००%	७.५०%
१८१ दिवस ते ३६५ दिवस	८.००%	८.५०%
१ वर्ष १ महिना ते २ वर्ष	९.२५%	९.७५%
२ वर्ष १ महिना ते ३ वर्ष	१०.००%	१०.५०%
३ वर्षापुढील मुदतीकरीता	१०.५०%	११.००%

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८६७/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३६ महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (१०.५०%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

आवर्तक ठेव योजना (RD) :- (०१/१०/२०२३ पासुन लागू)

अ.क्र	मुदत/कालावधी	व्याजदर
१	१३ ते २४ महिने	९.२५%
२	२५ ते ३६ महिने	९.५०%
३	३७ ते ६० महिने	१०.२५%
४	६० महिने ते पुढे	९.००%

जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात

१६ नोव्हेंबर रोजी शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना कलशारोहन कार्यक्रमाचे आयोजन



उदगीर (प्रतिनिधी) काशीपिठाचे जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात माळेवाडी येथे शिवलिंग प्राणप्रतिष्ठापना व कलाशारोहन कार्यक्रम १६ नोव्हेंबर रोजी संपन्न होत आहे.


उदगीर शहरालगत असलेल्या श्रीक्षेत्र माळेवाडी येथे उभारण्यात आलेल्या भव्य महादेव मंदिरात शिवलिंग प्राण प्रतिष्ठापना व कलशारोहन समारंभ दि. १६ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी १० वा. काशीपीठाचे जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न होणार आहे संपन्न होत आहे.

१४ नोव्हेंबर रोजी हिरेमठ संस्थान विम लखेड,गोरठा (बिदर) डॉ. राजशेखर शिवाचार्य स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली नुतन शिवलिंग व नंदी मुर्तीची मि रवणुक सकाळी ८ वाजता तर सायंकाळी ७ वाजता इष्टलिंग महत्व व प्राचिनता या विषयावर अशिर्वचन , शुक्रवार दि. १५ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वा. जगत्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वाम ीजी यांची सायंकाळी ५ वाजता भव्य मिरवणुक व सायंकाळी ७.३० वाजता धर्म सभेचे आयोजन शनिवार दि. १६ नोव्हेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता महादेव शिवलिंग व नंदी प्राणप्रतिष्ठापना संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास श्रीगुरु हावगीस्वामी मठाचे मठाधिश डॉ. शंभुलिंग शिवा-चार्य महाराज, श्रीअक्का महादेवी चैतन्यपीठ श्रीशैल्यम (आंध्रप्रदेश) प.पु. करुनादेवी माताजी हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास राज्यचे क्रिडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे, माजी आ. गोविंद केंद्रे, माजी आ. मनोहर पटवारी, माजी



नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, बस्वराज पाटील नागराळकर, मल्लिकार्जुन मानकरी, चंद्रकांत वैजापुरे, शिवाजीराव हुडे, सिध्देश्वर पाटील, बस्वराज पाटील कौळखेडकर, रमेशअण्णा अंबरखाने, बाप-ुराव राठोड, रामराव बिरादार, अनिल कोनमारे तर विशेष उपस्थितीत ह.भ.प. सुखदेव अडेप्पा स्वामी, शि.भ.प. शिवराज नावंदे गुरुजी, शि.भ.प. उध्दव महाराज हैबतपुरे, शि.भ.प. राजेश्वर स्वामी लाळीकर, शि.भ.प. रतिकांत स्वामी, शि.भ.प. बालाजी पाटील येरोळकर, श्रीमती लक्ष्मीताई पांढरे, कंटेप्पा, भंगुरे, शिवय्या स्वामी, सुशिलकुमार जीवने आदि उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात भाविक भक्तांनी उपस्थित राहुन दर्शन व अशिर्वचनाचा लाभ घ्यावा असे आवाहन श्रीक्षेत्र महादेव मंदिर ट्रस्ट व समस्त गावकरी मंडळी माळेवाडी ता.उदगीर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची देवणीत जाहीर सभा



उदगीर (प्रतिनिधी) निलंगा विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार संभाजीराव पाटील निलंगेकर यांच्या प्रचारार्थ केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांची देवणी येथील गुंडेराव पाटील मैदानावर उद्या मंगळवार दिनांक १२ रोजी सकाळी १० वाजता जाहीर सभा होणार आहे तरी या सभेस सर्वांनी उपस्थित रहावे असे आवाहन प्रदेश सचिव अरविंद पाटील निलंगेकर यांनी केले आहे.

दक्षिण मध्य रेल्वेकडून विशेष रेल्वेचे नियोजन



उदगीर (प्रतिनिधी) दक्षिण मध्य रेल्वे कडून गुरुनानक जयंती निमित्त विशेष रेल्वेचे नियोजन हुजूर साहिब नांदेड येथून बीदर ला जाण्या करिता विशेष गाडी

गुरुनानक जयंती निमित्त हुजूर साहिब नांदेड ते बीदर पूर्णपणे अनारक्षित विशेष ट्रेन चालवण्यात येत आहे.

गाडी क्रमांक ०७५०५ हुजूर साहिब नांदेड ते बिदर विशेष गाडी : ही गाडी नांदेड येथून दिनांक १४ नोव्हेंबर, २०२४ रोजी नांदेड येथून सकाळी ०८.३० वाजता सुटेल आणि पूर्णा, परभणी, गंगाखेड, परळी, लातूर रोड, उदगीर, कमलनगर, भालकी मार्गे बिदर येथे दुपारी १६.०० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७५०६ बिदर ते हुजूर साहिब नांदेड विशेष गाडी : ही गाडी बिदर येथून दिनांक १६ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी १४.३० वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच हुजूर साहिब नांदेड येथे २३.३० वाजता पोहोचेल.

गुरु माऊली, मन्मथ माऊलीच्या जयघोषात जळकोट ते कपिलधार पदयात्रा मार्गस्थ



जळकोट (माधव होनराव) वसुंधरारत्न राष्ट्रसंत डॉ. शिवलिंग शिवाचार्य महाराज राजूरकर यांच्या प्रेरणेने व कृपाशीर्वादाने, सिध्ददयाळ शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर, डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज मुखेडकर, युवा संत सदुरु राजशेखर शिवलिंग शिवाचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली म गुरु माऊली, मन्मथ माऊली, च्या जयघोषात जळकोट येथील सोमेश्वर महादेव मंदिर येथून मन्मथ स्वामी कपिलधार कडे पदयात्रा मार्गस्थ झाली आहे.

जळकोट येथून ही पदयात्रा लाळी, वाढवणा, संगाचीवाडी, बोथी, चाकूर, वडवळ, जानवळ, कारेपूर , पानगाव , घाटनांदूर, पूस, अंबेजोगाई मार्गे जात आज लोखंडी सावरगाव येथे मुक्कामी राहणार आहे. ता. १३ रोजी होळ मार्गे जात केज येथे पदयात्रेचा मुक्काम राहणार आहे. १४ रोजी मसाजोग मार्गे खडीकेंद्र येथे भक्तमंडळींचा मुक्काम राहणार आहे . १५ रोजी गणपती मंदिर मार्गे कपिलधार येथे पोहोचून पदयात्रेतील भक्तांचा मुक्काम राहणार आहे. ता. १६ रोजी पदयात्रेतील सर्व भक्तमंडळी कपिलधार येथे असणार आहेत.

या पदयात्रेचे नियोजन सरपंच धर्मपाल देवशेट्टे, अशोक कारभारी, मारुती महाराज भालके, विश्वनाथ सोनटक्के, धनराज शेटे, दत्ता बोधले, मन्मथ किडे, शंकर धुळशेट्टे, परमेश्वर धुळशेट्टे, विवेकानंद देवशेट्टे, प्रकाश मरतूळे, बाळू मिसाळे, वैजनाथ लद्दे, सुनील काळे, गोविंद भ्रमन्ना, ओमकार धुळशेट्टे, विनायक डांगे, नाक्षण कपाळे, मुक्रम बंडे, दिगांबर बोधले , विश्वनाथ म्हेत्रे यांनी केले आहे.

पदयात्रा दरम्यान विविध अन्नदात्यांच्या वतीने ठिकठिकाणी सहभागी भक्तांसाठी नाश्ता व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ही पदयात्रा सुरू आहे. याही वर्षी मोठ्या श्रद्धेने ही पदयात्रा मार्गस्थ झाली असून त्यामध्ये जळकोट शहर व तालुक्यातील शेकडो भक्त सहभागी झाले आहेत.

झाडे लावा झाडे जगवा

घर भाडयाने देणे आहे

राहते घर व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे नाईक चौक निडेबन रोड, उदगीर येथील राहते घर ६०X४५ चे सर्व सोईनी युक्त बँक, हॉस्पिटल, व्यापार, कोचिंग क्लासेस व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे.

संपर्क

रतिकांत शिवकुमार अंबेसंगे

९४२१०७०००० ९०२१०७०००

जाहीर प्रगटन

दिनांक ११-११-२०२४

आमचे अशिल नामे मानसी दयानंद थोटे रा. नळगीर ता उदगीर जि. लातूर तसेच रा. प्लॉट क.११ सर्वे क २१४ नगर परिषद क २-२-१४३९/१/१ यांनी माहिती देवून अधिकृत केल्यावरून सदरचे जाहिर प्रगटन प्रसिध्दीस देण्यात येत आहे त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

१. हे की आमचे अशिल वरील नमूद मिळकतीचे मालक व कब्जेदार असून सदरील मिळकतीची चतु सिमा येणेप्रमाणे आहे पुर्वेस १५ फफुटाचा रस्ता, पश्चिमेस - प्लॉट क १०, दक्षिणेस २० फफुटाचा रस्ता व उत्तरेस चाकुरे यांची जमीन


२. हे की, आमचे अशिलांनी सदरीत मिळकत लक्ष्मण मारोती हावा यांच्याकडून दिनांक ४-१०-२०१९ रोजी पंजीकृत खरेदीखत क्र. ५५४६/२०१९ अन्वये खरेदी केली आहे सदरील मिळकतीवर आमचे अशिलांचा प्रत्यक्ष तावा असून वहिवाटीत आहे सदरील मिळकतीवर आमचे अशिलानी पत्रयाची एक खोली बांधली असून वास्तव्य करून आहे सदरील मिळकत नगर परिषद उदगीर यांच्या कार्यालयात आमचे अशिलाच्या नावाने नोंदविलेली आहे तसेच, नियमानुसार आमचे अशिल कराचा भरणा करीत आहेत आमचे अशिलाच्या असे ऐकीवात आले आहे की काही व्यक्ती दिशाभूल करून आम चे अशिताची मिळकत इतरांना दाखवून विक्री करण्याचा मनोदय व्यक्त करीत आहे. याकरिता सर्व जनतेस व तमाम नागरिकास कळविण्यात येते की कोणीही व्यक्तींनी अशा दिशाभूल करणा-या व्यक्तीशी संपर्क ठेवू नये आणि हस्तांतर व्यवहार करू नये तसे केल्यास होणाऱ्या खर्चास व परिणामास ते सर्वस्वी जबाबदार राहतील

सबब जाहिर प्रगटन प्रसिध्दीस दिले.

जाहीर प्रगटन देणार
मानसी दयानंद थोटे,
रा. प्लॉट क्र. ११ सर्वे क्र. २१४ नगर
परिषद क्र. २-२-१४३९/१/१, उदगीर
मो.नं. ७४००२९३०६०

तर्फे
अॅड. एल.एस.मध्वरे
विधीज्ञ, उदगीर

प्रा. रा.वा. गचके यांचे निधन



उदगीर (प्रतिनिधी) उदगीर येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील माजी वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. राजाराम वासुदेव गचके यांचे वृद्धापकाळाने दीनानाथ मंगेशकर रुग्णालय पुणे येथे आज दिनांक १० नोव्हेंबर २०२४ रोजी दुपारी चार वाजता निधन झाले त्यांच्यावर ११ नोव्हेंबर२०२४ रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथे अंत्यसंस्कार झाले . मृत्यू समय त्यांचे वय ८५ वर्ष होते.विद्यार्थी प्रिय, व्यासंगी प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक होता. त्यांच्या पश्चात मुलगा जयदीप, सून व दोन मुली व नातवंडे असा परिवार आहे. गचके परावारावर कोसळलेल्या दु:खात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे,

माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा ही अभिनंदनीय व प्रेरणादायी बाब- डॉ. ज्ञानोबा मुंढे



उदगीर (प्रतिनिधी) जिजामाता विद्यालय तोंडचिर येथे सन २००४ -०५ या शैक्षणिक वर्षांमध्ये शिक्षण झालेल्या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने स्नेह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून गट साधन केंद्र उदगीर येथील विषय साधनव्यक्ती डॉ. ज्ञानोबा मुंढे यांनी माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा म्हणजे अतिशय प्रेरणादायी बाब आहे असे मत व्यक्त केले. यावेळी मंचावर सन २००४-०५यावर्षी च्या विद्यार्थ्यांना शिकवणारे सर्व शिक्षक उपस्थित होते. माजी विद्यार्थ्यांच्या वतीने आपल्या सर्व गुरुजनांचा ट्रॉफफी, शॉल, श्रीफफळ व हार घालून जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजेंद्र एकंबेकर हे होते.

पुढे बोलताना डॉ. ज्ञानोबा मुंढे म्हणाले की जिजामाता विद्यालयातून आज पर्यंत किती डॉक्टर घडले, किती इंजिनियर घडले, कीती अधिकारी घडले, किती कर्मचारी घडले हे महत्त्वाचं नसून माणुसकीचे दर्शन घडविणारे किती माणसं घडले हे खूप महत्त्वाचं आहे. आज मुले मोठे होऊन शिक्षण घेऊन मोठे झाल्यावर नोकरीला लागल्यावर जन्मदात्या आई-वडिलांना सुद्धा विचारायला तयार नाहीत परंतु जिजामाता विद्यालयातील विद्यार्थी वीस वर्षाच्या नंतर स्वेच्छेने एकत्रित येऊन स्वखर्चानं आपल्या गुरुजनांचा जाहीर सत्कार करतात. हे निश्चितच अभिनंदनिय, अभिमानास्पद आणि समाजाने प्रेरणा घेण-ारी प्रेरणादायी बाब आहे. असे मत डॉक्टर ज्ञानोबा मुंढे यांनी व्यक्त केले. यावेळी बाबुराव नागरवाड सर, राम हाडोळे सर खिंडीवाले सर व्ही टी कांबळे सर या माजी शिक्षकांनी आपले मनोगत मांडले. आपल्या भावना व्यक्त केल्या आणि खरोखरच २००४-०५ च्या बॅचचे विद्यार्थी हे समाजाने आदर्श घेणारे विद्यार्थी आहेत. असे मत मांडले. याप्रसंगी अध्यक्षीय समारोप करताना राजेंद्र एकंबेकर म्हणाले की, या विद्यार्थ्यांचा समाजाने आदर्श घेतला पाहिजे. प्रत्येक शाळा महाविद्यालयातून असे विद्यार्थी घडले पाहिजेत. असे म्हणून त्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे तोंड भरून कौतुक केले. याप्रसंगी सर्वच माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत मांडले. आपल्या भावना व्यक्त केल्या. जुन्या आठवणींना उजाळा देण्याचे काम केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जयश्री शिंदे यांनी मांडले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव उत्तमराव वागदरे यांनी केले. तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कृष्णा जाधव यांनी मांडले. कार्यक्रम संपल्यानंतर सर्व माजी विद्यार्थी व शिक्षकांनी स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सुद्धा उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सन २००४-०५ च्या बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

CHANGE OF NAME

I have change my name from "SHAIKH MD AAMER ISAMIYA" TO" AAMER SHAIKH" and Mother's name from "ANJUM" to "SALMA ANJUM SHAIKH". Hence for this declaration, In future I will use this name.

Old Name: SHAIKH MD AAMER ISAMIYA
New Name: AAMER SHAIKH
MOTHER OLD NAME: ANJUM
MOTHER NEW NAME: SALMA ANJUM SHAIKH
Address:-
PINJAR GALLI, NEAR MAHEBOOB PURA MASJID UDGIR, LATUR PIN-413517 MAHARASHTRA
Cell : +91-8087826123